- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५३ | किंमत : २ रूपये

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# मुलासह आई-वडिलांचा डोंगरावरुन पडून मृत्यू

**वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर**

छत्रपती संभाजीनगरमध्ये आज (शुक्रवारी, ता २१) एका मुलासह त्याच्या आई-वडिलांचा डोंगरावरुन पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. छत्रपती संभाजीनगरच्या तीसगाव भागातील खवड्या डोंगरावरती ही थरारक घटना घडली आहे. एक १८ वर्षाचा तरूण जीवन संपवण्यासाठी डोंगरावरती गेला होता. त्यावेळी त्याचे आई-वडील आणि स्थानिक लोक त्याला वाचवण्यासाठी डोंगरावर गेले. आई-वडील आणि स्थानिक लोक त्या मुलाला उडी मारु नकोस, असे समजावत होते. मात्र, मुलगा ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. वडील आपल्या मुलाची खूप समजूत काढण्याचा प्रयत्न करत होते. अखेर वडिलांनी पुढे जात मुलाला पकडण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी मुलाने डोंगरावरुन उडी टाकली होती, त्याला पकडण्याच्या प्रयत्नामध्ये वडिलांचाही तोल जाऊन तेदेखील खाली पडले. हे दोघेही डोंगराच्या दरीत खाली पडताच त्यांचा मृत्यू झाला. हा प्रकार पाहून मुलाच्या आईनेही डोंगरावरुन खाली उडी मारली. त्यामुळे तिचाही मृत्यू झाला. या घटनेनं हळहळ व्यक्त होत आहे. तर या प्रकरणी प्रत्यक्षदर्शी असलेले तीसगावचे माजी सरपंचांनी सविस्तर माहिती दिली आहे.





त्या तरूणाची समजूत काढण्याचा प्रयत्न करणारे प्रत्यक्षदर्शी तीसगावचे माजी सरपंच संजय जाधव यांनी याबाबतची माहिती दिली, ते म्हणाले की, "देवळाली येथून एक तरुण याठिकाणी आला होता, जवळपास त्याचं वय १८ वर्ष होतं, तो इथे येऊन डोंगराच्या कड्यावर १० वाजेपासून ते १ वाजेपर्यंत तो नाट्यथ्रिलर करत होता. तो ऐकायला तयार नव्हता. मी त्याच्याजवळ ५ फूट अंतरावर असताना, मीसुद्धा गावाच्या वतीने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, पोलीस कर्मचारी माझ्यासोबत होते, परंतु मुलगा ऐकण्याच्या स्थितीत नव्हता. तो वारंवार जागा बदलत होता आणि आईशी संवाद साधत होता. आईनीसुद्धा भरपूर त्याला विनंती केली की, बाळा, असं नको करू, तसं नको करू. पण त्यांनी काही ऐकण्याच्या स्थितीत नव्हता, डिप्रेशनमध्ये गेलेला होता. आईने विनंती केली, जवळपास ३ तास आम्ही त्याची विनंती करत होतो.

त्याच्यानंतर त्याचे वडील खाली होते. खालीवरून त्याचे वडीलसुद्धा विनंती करत होते. परंतु, काही क्षणात १५-२० मिनिटात शेवटच्या त्याचे वडील वरती आले, आम्हाला वाटलं तो समजवण्याच्या नादात त्याला थोडं बोलतील, परंतु ते मुलाला धरायला गेले आणि तो मुलगा आणि वडील अगोदर खाली कोसळले आणि नंतर त्याच्या आईनेसुद्धा उडी मारून घेतली. ते हे देवळाली पॉईंटचे असा अंदाज आहे. याचं काय कारण आहे ते माहिती नाही, त्यांचं घरगुती काय असल माहिती नाही. मुलाचे नाव कृष्णा चांदगुडे नाव आहे, वय १८ वर्ष होतं.

आम्ही त्याला सांगितलं, बाबा, आईकडं बघ, उडी नको मारू, तू शिक्षित आहे, अडाणी नाहीये. तुझं काही भविष्य बघ, आईला सांभाळ, वडिलांना सांभाळ, अशी विनंती आम्ही केली. तो, नाही, नाही, मला मरायचंच आहे असं म्हणत होता. हे १० वाजताच्या आसपास चढला होता, १ च्या जवळपास आता ही घटना घडली अशी माहिती देखील त्यांनी दिली आहे. तर मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल मुरलीधर चांदवडे, मुरलीधर चांदवडे, संगीता चांदवडे अशी मृतांची नावे आहेत. तर हे देवळाई सातारा परिसर येथील असल्याची माहिती आहे.

## थोडक्यात

### गणेशभक्तांना एसटीचे तिकीट स्वस्तात

**मुंबई :** गणेशोत्सव महिन्यावर येऊन ठेपला आहे. चाकरमान्यांची गणपतीसाठी गावी जाण्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. रेल्वे बुकिंग, बसची बुकिंग तीन महिन्याआधीच फुल झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर चाकरमान्यांची गैरसोय होऊ नये म्हणून एसटी महामंडळाने आरक्षित एसटी बुकिंगमधील अतिरिक्त कर रद्द केले आहेत. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या हजारो भाविकांना दिलासा देणारा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर एसटी महामंडळाने घेतला आहे. आता संपूर्ण एसटी बस आरक्षित (ग्रुप बुकिंग) करण्यासाठी पूर्वी आकारण्यात येणारे ३० टक्के अतिरिक्त शुल्क रद्द केल्यामुळे गणेशभक्तांना स्वस्तात एसटी बसने प्रवास करता येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. गणेशोत्सव आणि एसटीचे कोकणवासीयांशी अनेक वर्षांपासून घट्ट नाते आहे. मुंबई, ठाणे आणि पालघरमधून दरवर्षी हजारो कोकणवासी एसटीने गणेशोत्सवासाठी आपल्या गावी जातात. गणेशोत्सवाच्या काळात दरवर्षी सुमारे ५ हजार एसटी बसेस आरक्षित केल्या जातात. प्रवाशांना गावी सोडल्यानंतर या बसेस रिकाम्या परत आणाव्या लागतात. त्यामुळे एसटी महामंडळाला इंधन तसेच चालक आणि वाहकांच्या अतिरिक्त कामाचा खर्च सहन करावा लागतो. डिझेलच्या वाढलेल्या किमती आणि कर्मचाऱ्यांच्या अतिकालीन भत्त्यात झालेली वाढ यामुळे एसटीचा खर्च वाढला आहे.

# तीन दिवसाच्या बाळाचा मृत्यू, मानसिक धक्क्यामुळे रुग्णालयातून केली बाळाची चोरी

## नागपुरातील डागा रूग्णालयातील प्रकार, बाळ चोरणारी महिला बाळासह सापडली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरमध्ये आज एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नागपूरच्या डागा रुग्णालयातून आज दुपारी नवजात बाळाची चोरी झाल्याची घटना समोर आली होती. या घटनेनंतर नागपूर जिल्ह्यात खळबळ उडाली होती. दरम्यान, या घटनेनंतर तात्काळ पोलिसांनी याबाबतची माहिती देण्यात आली होती. यानंतर पोलिसांनी तातडीने सुत्र हलवल्याने त्यांना मोठं यश मिळालं आहे. चोरीला गेलेलं बाळ आणि चोरणाऱ्या महिलेला पोलिसांनी काही तासातच शोधून काढलं आहे.





आज संध्याकाळी यशोधरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत बाळ चोरणारी महिला बाळासह सापडली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार बाळ चोरणाऱ्या महिलेचे काही दिवसापूर्वी तीन दिवसांच्या बाळाचा मृत्यू झाला होता. त्यामुळं ती महिला मानसिक धक्क्यात होती. यामुळेच तिने डागा रुग्णालयातून बाळ चोरी केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी संशयित महिलेचा शोध सुरु केला होता.

नागपुरातील डागा रुग्णालयातून आज दुपारी नवजात बाळाची चोरी झाल्याचे समोर आले होते. अवघ्या एक दिवसाच्या बाळाला घेऊन जाताना एक बुरखा धारी महिला सीसीटीव्ही मध्ये चित्रित झाली होती. बाळाला लस दिल्यानंतर आईला ५ हजार आणि बाळाला ५०० रुपये मिळतील, असं आमिष तिने बाळाच्या आजीला दाखवत फसवलं होतं. बुरखाधारी महिलेने आजीच्या हातातून बाळ घेऊन रुग्णालयाच्या बाहेर निघून गेली होती. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी संशयित महिलेचा शोध सुरु केला होता. बसस्थानक, रेल्वे स्टेशन आणि ऑटोचालकांकडेही माहिती घेतली जात होती. संध्याकाळच्या सुमारास यशोधरा नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत ती संशयित महिला चोरलेल्या बाळासह पोलिसांना मिळून आली.

# दैनिक सिंहवाणी वृत्त 'ज्येष्ठ पत्रकार राधाकृष्ण नार्वेकर स्मृती पुरस्कार' जाहीर

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

मराठी वृत्तापत्र लेखक संघ, मुंबईतर्फे दैनिक सिंहवाणी वृत्तला यंदाचा 'ज्येष्ट पत्रकार राधाकृष्ण नार्वेकर स्मृती पुरस्कार' जाहीर झाला आहे. पत्रकारिता लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जाते. समाजाचे प्रबोधन आणि जनतेचा आवाज बुलंद करणारी वर्तमानपत्रे ही देशाच्या स्वातंत्र्य पूर्वकाळापासून देशाच्या अखंडत्वाचे आणि लोकशाही रक्षणाचे काम निर्भीडपणे करीत आली आहेत.

संपादकीय पानावर निर्भिड व निःस्वार्थीपणे व्यक्त होणाऱ्या वृत्तपत्रलेखकांची प्रातिनिधिक असलेली राज्यस्तरीय संघटना "मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई" ही आमची संस्था २२ ऑगस्ट २०२६ रोजी आपला ७८ वा "वृत्तपत्र लेखक दिन" साजरा करीत आहे. आजपर्यंत संस्थेच्या या वाटचालीत पत्रकारितेतील अनेक मान्यवरांनी संस्थेच्या


पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जाते. समाजाचे प्रबोधन आणि जनतेचा आवाज बुलंद करणारी वर्तमानपत्रे ही देशाच्या स्वातंत्र्य पूर्वकाळापासून देशाच्या अखंडत्वाचे आणि लोकशाही रक्षणाचे काम निर्भीडपणे करीत आली आहेत.
संपादकीय पानावर निर्भिड व निःस्वार्थीपणे व्यक्त होणाऱ्या वृत्तपत्रलेखकांची प्रातिनिधिक असलेली राज्यस्तरीय संघटना "मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई" ही आमची संस्था 22 ऑगस्ट 2026 रोजी 78 वा "वृत्तपत्र लेखक दिन" साजरा करीत आहे.
पत्रकारितेच्या क्षेत्रात आपले दैनिक निर्भिड व प्रखरतेचा वसा घेऊन गेली अनेक वर्षे सातत्याने कार्यरत आहे. आपल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन आम्ही संस्थेच्या वतीने आपल्या दैनिकाला पुरस्कार सन्मानाने प्रदान करीत आहोत.
"ज्येष्ठ पत्रकार राधाकृष्ण नार्वेकर स्मृती पुरस्कार"
आपल्या सातत्यपूर्ण, निर्भिड, वस्तुनिष्ठ आणि समाजहिताच्या पत्रकारितेचा हा सन्मान स्वीकारून आपण असेच सर्वसामान्यांच्या हितासाठी अखंड कार्य करावे ही सदिच्छा!

वाटचालीत महत्वाचे योगदान दिले आहे. पत्रकारितेच्या क्षेत्रात आपले दैनिक निर्भिड व प्रखरतेचा वसा घेऊन गेली अनेक वर्षे सातत्याने कार्यरत आहे. दैनिक सिंहवाणी वृत्तच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन संस्थेच्यावतीने सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

दादर सार्वजनिक वाचनालय आणि धुरू हॉल ट्रस्ट येथे दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजता आयोजित करण्यांत आलेल्या ७८ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आणि मुक्तपीठचे संपादक तुळशीदास भोईटे यांचे "संविधानचं अधिष्ठान वर्तमानाचं भान" या विषयावर वृत्तपत्र लेखकांच्या समवेत मुक्तचिंतन होणार आहे. यावेळी मनमोहन चोणकर आणि शिक्षणमहर्षी शिवराम उतेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

आपल्या सातत्यपूर्ण निर्भिड, वस्तुनिष्ठ आणि समाजहिताच्या पत्रकारितेचा हा सन्मान स्वीकारून आपण असेच सर्वसामान्यांच्या हितासाठी अखंड कार्य करावे अशी सदिच्छा, मराठी वृत्तापत्र लेखक संघ, मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, प्रशांत घाडीगावकर (प्रमुख कार्यवाह), रमेश सांगळे (कार्याध्यक्ष), आत्माराव गायकवाड (कोषाध्यक्ष), सुनील कुवरे, नितीन कदम कार्यवाह), दिगंबर चव्हाण, विजय कदम यांनी दिल्या आहे.

# मराठी न येणाऱ्या १,२६८ रिक्षा चालकांना नोटीस जारी

**मुंबई :** राज्य सरकारने ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालवणाऱ्या व्यावसायिक चालकांसाठी व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य केले आहे. या निर्णयाचा मुख्य उद्देश चालक आणि प्रवाशांमधील संवाद अधिक चांगला आणि सुलभ करणे हा आहे. या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी परिवहन विभागाने गुरुवारपासून संपूर्ण राज्यात विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. मोहिमेच्या पहिल्याच टप्प्यात मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान नसलेल्या एकूण १,२६८चालकांना नोटीस बजावण्यात आली आहे. मुंबई आणि उपनगरात मोठ्या प्रमाणात अमराठी रिक्षा चालक आहेत. अशातच आता मुंबई आणि आसपासच्या परिसरात परिवहन विभागाच्या पथकांकडून विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. एमएमआर भागातील एकूण ३,९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६०४ चालकांना दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेले व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान नसल्याचे आढळून आले. या सर्व चालकांना तात्काळ नोटीस बजावण्यात आली आहे.

# १० वर्षीय विद्यार्थिनीवर शाळेत अत्याचार, ५० वर्षीय मुख्याध्यापकाला अटक

**वृत्तसंस्था, नांदेड**

शहरातील श्रीनगर परिसरातील एका शाळेत दहा वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याच शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या ५० वर्षीय व्यक्तीने अल्पवयीन विद्यार्थिनीशी गैरकृत्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शाळेत असताना संबंधित मुख्याध्यापकाने मुलीसोबत गैरवर्तन केल्याचा आरोप आहे. यावेळी मुलीने आरडाओरड केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेनंतर घाबरलेल्या मुलीने आपल्या पालकांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर पालकांनी तातडीने भाग्यनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

पालकांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत भाग्यनगर पोलिसांनी काल रात्री संशयित मुख्याध्यापकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्याच्यावर अल्पवयीन मुलांच्या लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करणाऱ्या पोक्सो कायद्यासह ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गतही गुन्हा नोंदवण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणातील ५० वर्षीय संशयित मुख्याध्यापकाला ताब्यात घेतले आहे. या घटनेची सखोल चौकशी सुरू असून, मुलीचे जबाब आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पुढील तपास केला जात आहे.






संपादकीय लेखणीतून...

## सनईसम्राट बिस्मिल्ला खान

भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी सनईवादनाकरिता बिस्मिल्ला खान यांना पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी लाल किल्ल्यावर आमंत्रित केले होते. त्यांनी देश विदेशात अनेक ठिकाणी सनईवादनाचे कार्यक्रम केले. त्यांच्या सनईवादनाच्या ध्वनिमुद्रिका भारतात व परदेशांतही अत्यंत लोकप्रिय आहेत. गूंज उठी शहनाई या हिंदी चित्रपटातील त्यांचे सनईवादन फार लोकप्रिय ठरले. स्वदेस या हिंदी चित्रपटासाठी देखील त्यांनी सनईवादन केलेले आहे. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव सनईवादनात तर कनिष्ठ चिरंजीव नाझिम तबला व सनईवादनात निपुण आहेत. बिस्मिल्ला खान यांनी सनईवादनाला बैठकीत स्वतंत्र प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यांनी सरोदवादक अमजद अलीखाँ आणि सतारवादक रवी शंकर इत्यादींसोबत जुगलबंदीचे कार्यक्रमही सादर केले आहेत. सनईवादनामध्ये त्यांनी संगीतक्षेत्रात एकमेवाद्वितीय असे स्थान पटकावले. ते शिया मुसलमान असल्यामुळे त्यांच्या समाजातील काही लोकांचा त्यांना सुरुवातीस विरोध होता; पण तरीही त्यांनी नेटाने सनईवादनाची परंपरा कायम राखली व त्यात नवनवीन प्रयोग केले.

बिस्मिल्ला खान हे अखिल भारतीय कीर्तीचे सुप्रसिद्ध सनईवादक व भारतरत्न पुरस्काराचे मानकरी होत. त्यांचे मूळनाव कमरूद्दिन खान होते. बिस्मिल्ला खान यांचा जन्म सनईवादकांच्या कुटुंबात बिहार प्रांतातील शहाबाद जिल्हा- आताचा बक्सर जिल्हा येथील दुमराव या गावी दि.२१ मार्च १९१६ रोजी झाला. त्यांचे आजोबा रसूल बक्ष हे दुमरावच्या दरबारी सनईवादक म्हणून नोकरीस होते. सनईवादन हा त्यांच्या घराण्याचा कौटुंबिक व्यवसाय असल्यामुळे लहानपणीच त्यांना आपल्या वडिलांकडून- खानसाहेब पैगंबर बक्ष यांच्याकडून सनईवादनाचे संस्कार लाभले. त्यांनी आपल्या मामांकडे- खानसाहेब अलिबक्ष यांच्याकडे वयाच्या सहाव्या वर्षापासून वाराणसी येथे सनईवादनाचे पद्धतशीर शिक्षण घेण्यास सुरुवात केली. तसेच विलायत हुसेन आणि सादिक अली यांच्याकडेही त्यांनी संगीताचे धडे घेतले. हळूहळू आपल्या मामांबरोबर, त्यांची साथ करण्यासाठी लग्नासारख्या उत्सवप्रसंगी तसेच संगीत संमेलनांत ते जाऊ लागले. त्यांच्याबरोबर बिस्मिल्ला खान यांनी सन १९३० साली वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी अलाहाबादच्या अखिल भारतीय संगीत परिषदेत पहिल्यांदा सनई वादनाचा सार्वजनिक कार्यक्रम केला. दुसरा कार्यक्रम लखनौ येथे प्रदर्शनानिमित्त झालेल्या संगीत संमेलनात करून उत्तम वादनाबद्दल सुवर्णपदक मिळवले. तद्वतच सन १९३७ मधील कोलकात्याच्या अखिल भारतीय संगीत परिषदेत त्यांनी तीन सुवर्णपदके मिळवून रसिकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. दुसऱ्या वर्षी लखनौ येथे ऑल इंडिया रेडिओ केंद्रावर प्रथम कार्यक्रम सादर केला. येथून पुढे त्यांच्या सनई वादनाच्या उज्ज्वल कारकीर्दीला सुरुवात झाली. सन १९४० साली ते व त्यांचे बंधू खानसाहेब शमसुद्दीन खान यांनी एक संगीत मंडळी स्थापन करून कार्यक्रम सादर करण्यास सुरुवात केली. पुढे अल्पावधीतच प्रथम श्रेणीचे सनईवादक म्हणून त्यांनी लौकिक संपादन केला. या दरम्यान कन्नड अभिनेते राजकुमार यांच्या सनादी अप्पण्णा या चित्रपटासाठी त्यांनी सनईवादन केले. सत्यजित राय यांच्या जलसाघर या चित्रपटात त्यांनी भूमिका साकारली.

सनईसारख्या वाद्यावर गायकीचे सर्व प्रकार लीलया निर्माण करणारा अत्यंत सुरेल वादक म्हणून बिस्मिल्ला खान ख्यातनाम आहेत. गायन-वादनाच्या शैलींचा अपूर्व समन्वय त्यांच्या ठिकाणी दिसून येत असे. मींड, गमकादींचाही त्यात अंतर्भाव होतो. ख्याल, ठुमरी वगैरे संगीतप्रकारांप्रमाणेच कजरी, चैती, पूरबी अशा लोकधुनीही ते कौशल्याने हाताळत असत. सनईच्या फुंकीवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते, त्यामुळे त्यांचे वादन अत्यंत भावपूर्ण होत असे. लयीच्या साथीसाठी ते छड्यांनी वाजवले जाणारे खोरदक नावाचे वाद्य घेत असत. ते १९६२ मध्ये अफगाणिस्तान व पाकिस्तान येथे गेले आणि १९६४ मध्ये एडिंबरो संगीत महोत्सवात त्यांनी भाग घेतला. १९६७ मध्ये ते अमेरिकेला गेले. तसेच त्यानंतर इंटरनॅशनल म्यूझिक कौन्सिलच्या निमंत्रणावरून त्यांनी यूरोपचा दौरा केला.

बिस्मिल्ला खान यांच्या असामान्य कलागुणांमुळे सन १९५५ मध्ये त्यांना नॅशनल कल्चरल ऑर्गनायझेशन या राष्ट्रीय सांस्कृतिक संघटनेकडून अखिल भारतीय शहनाई चक्रवर्ती हा किताब मिळाला. पुढील वर्षात संगीत नाटक अकादमीतर्फे सन्मान लाभला आणि सन १९६१मध्ये भारत सरकारकडून पद्मश्री, सन १९६८मध्ये पद्मभूषण आणि सन १९८०मध्ये पद्मविभूषण या पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. मध्यप्रदेश शासनाकडून तानसेन पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला. रॉयल नेपाळ आर्ट अकॅडमी तफेर्ही त्यांना सर्वोच्च मान लाभला. सन २००१मध्ये भारत सरकारने सनई वादनातील त्यांच्या अद्वितीय कामगिरीकरिता भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने त्यांना गौरविले. शहनाई वादक बिस्मिल्ला खान यांचे वाराणसी येथे दि.२१ ऑगस्ट २००६ रोजी हृदय विकाराने दुःखद निधन झाले.

# 'दुर्मिळातील दुर्मिळ' गुन्हे: फाशीची शिक्षा कायम ठेवण्यावर शिक्कामोर्तब

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

अंमलबजावणीच्या पद्धतीबाबत सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचा निकाल दिला आहे. फाशीऐवजी कमी वेदनादायी पयार्यांचा अवलंब करावा आणि सध्याची फाशीची पद्धत असंवैधानिक घोषित करावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका न्यायालयाने फेटाळून लावली आहे. ज्येष्ठ वकील ऋषी मल्होत्रा यांनी २०१७ मध्ये दाखल केलेल्या या याचिकेत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३५४(५) च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देण्यात आले होते, ज्यामध्ये दोषीला मरेपर्यंत फासावर लटकवण्याची तरतूद आहे. याचिकाकर्त्यांचा असा युक्तिवाद होता की, घटनेच्या कलम २१ नुसार सन्मानाने जगण्याच्या अधिकारात सन्मानाने आणि कमीत कमी यातनांसह मृत्यू मिळणेही समाविष्ट आहे; फाशीच्या प्रक्रियेत वैद्यकीयदृष्ट्या मृत्यूची पुष्टी होण्यासाठी २० ते ४० मिनिटे लागतात, ज्यामुळे होणारा शारीरिक छळ अमानवीय आहे. त्यामुळे विषारी किंवा घातक इंजेक्शन, गोळ्या झाडणे, विजेचा तीव्र झटका किंवा गॅस चेंबर यांसारख्या आधुनिक व वेगवान पयार्यांचा विचार व्हावा, अशी मागणी करण्यात आली होती.

सुनावणीदरम्यान विधी संशोधन संस्था 'प्रोजेक्ट ३९ए' आणि याचिकाकर्त्यांनी आंतरराष्ट्रीय अनुभवांचे संदर्भ दिले, ज्यात अमेरिकेतील सुमारे ३६ राज्यांनी फाशी बंद करून घातक इंजेक्शनसारखे मार्ग स्वीकारल्याचे नमूद केले. मात्र, घातक इंजेक्शनमध्ये योग्य शिरा न मिळणे, औषधांचे अयोग्य प्रमाण किंवा वैद्यकीय व्यावसायिकांचा नैतिक नकार यामुळे दोषीला तीव्र वेदना झाल्याच्या आंतरराष्ट्रीय नोंदी न्यायालयासमोर आल्या. तसेच गोळी झाडणे किंवा गॅस चेंबर या पद्धतींमध्येही व्यावहारिक अडचणी असल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय, फाशीची अंमलबजावणी करणारा जल्लाद, उपस्थित अधिकारी आणि डॉक्टर यांच्यावर पडणाऱ्या गंभीर मानसिक आणि मनोवैज्ञानिक ताणावरही न्यायालयाने विचार केला.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने निकाल देताना स्पष्ट केले की, सध्या उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक व वैद्यकीय माहितीच्या आधारे फाशीच्या पद्धतीला असंवैधानिक ठरवता येणार नाही. केंद्र सरकारच्या वतीने अँटर्नी जनरल आर. वेंकटमणी यांनी पयार्यी पद्धतींवर तज्ज्ञ पातळीवर विचार केला जाऊ शकतो असे सांगितल्याने, न्यायालयाने भविष्यात वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध आणि कमी वेदनादायी पयार्यांचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारला तज्ज्ञ समिती नेमण्याचा मार्ग खुला ठेवला आहे. परिणामी, सध्या भारतात मृत्युदंडासाठी फाशीचीच कायदेशीर पद्धत कायम राहणार असून, ठोस पुराव्यांशिवाय कायदेमंडळाच्या अधिकारात थेट हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

मृत्युदंड आणि कायदेशीर तरतुदींच्या संदर्भात कायदेतज्ज्ञांचा दृष्टिकोन स्पष्ट आणि संतुलित राहिला आहे. कायदेतज्ज्ञांच्या मते, फाशी, घातक इंजेक्शन किंवा अन्य कोणतीही पद्धत ठरवण्याचा अधिकार प्रामुख्याने संसदेचा (कायदेमंडळाचा) असून न्यायालयाची भूमिका केवळ कायद्याची घटनात्मक वैधता तपासण्यापुरती मर्यादित असते. जोपर्यंत संसद फौजदारी कायद्यांमध्ये अधिकृत सुधारणा करत नाही, तोपर्यंत सध्याच्या कायदेशीर तरतुदींची अंमलबजावणी करणे अनिवार्य ठरते.

केवळ एखाद्या पद्धतीला 'कमी वेदनादायी' मानून चालत नाही, तर त्यासाठी आंतरराष्ट्रीय अनुभव, तांत्रिक बाबी आणि वैद्यकीय पुरावे तपासणे आवश्यक असते. घातक इंजेक्शनसारख्या पद्धतींमध्येही जागतिक स्तरावर त्रुटी आढळल्याने, सखोल वैज्ञानिक अभ्यासाशिवाय थेट बदल करणे योग्य ठरणार नाही. भारतात मृत्युदंड हा केवळ 'दुर्मिळातील दुर्मिळ' प्रकरणांमध्येच दिला जात असल्याने, गुन्हेगारांचे अधिकार, पीडितांना मिळणारा न्याय आणि समाजातील कायद्याचा धाक या सर्वांचा समतोल राखणे गरजेचे आहे. त्यामुळे सध्याच्या फाशीच्या पद्धतीला तातडीने बेकायदेशीर न ठरवता, भविष्यातील बदलांचा निर्णय केंद्र सरकारने तज्ज्ञ समिती आणि वैज्ञानिक निष्कर्षांच्या आधारावरच घ्यावा, हा कायदेविषयक विचार या संदर्भात महत्त्वाचा ठरतो.

- ९५६१५९४३०६

# रवींद्र जडेजा बळी मिळवूनही 'नो-बॉल'मुळे ठरतोय खलनायक!

**कसोटी, वनडे आणि टी-२० मधील सविस्तर विश्लेषण**

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

रवींद्र जडेजा हा जागतिक क्रिकेटमधील सर्वांत अचूक, वेगवान आणि शिस्तबद्ध फिरकीपटूंपैकी एक मानला जातो. वेळेची बचत करत सलग एकाच टप्प्यावर गोलंदाजी करणे ही त्याची मुख्य ओळख आहे. मात्र, याच जागतिक दर्जाच्या गोलंदाजाच्या कारकिर्दीतील एक विचित्र आणि डोकेदुखी ठरलेली उणीव म्हणजे त्याचा 'फ्रंट-फूट नो-बॉल'. एका फिरकीपटूने नो-बॉल टाकणे हे क्रिकेट जगतात अक्षम्य मानले जाते, आणि जडेजाने टाकलेल्या नो-बॉलवर जेव्हा फलंदाज बाद होऊनही केवळ रेषेबाहेर पाय पडल्यामुळे बचावले, तेव्हा त्याचा थेट फटका भारतीय संघाला बसला आहे.

**१. कसोटी क्रिकेटमधील सर्वांत गाजलेले प्रसंग**

कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजाला बाद करणे हे अत्यंत संयमाचे काम असते. अशा वेळी मिळालेली विकेट नो-बॉलमुळे रद्द होणे संघाच्या मनोबलावर परिणाम करते. जडेजाच्या बाबतीत घडलेल्या काही प्रमुख घटना अशा आहेत:

मार्नस लाबुशेन (ऑस्ट्रेलिया वि. भारत - इंदूर कसोटी, २०२३): इंदूर कसोटीच्या पहिल्याच दिवशी भारतीय संघ अवघ्या १०९ धावांवर गारद झाला होता. त्यामुळे भारताला सुरुवातीलाच बळी मिळवणे अत्यंत आवश्यक होते. ऑस्ट्रेलियाच्या डावातील चौथ्याच षटकात जडेजाने जगातील अव्वल फलंदाज मार्नस लाबुशेनला शून्य (०) धावांवर अप्रतिमरीत्या त्रिफळाचीत केले. लाबुशेन पॅव्हेलियनकडे परतू लागला असतानाच मैदानावरील पंचांनी टीव्ही अंपायरकडे तपासणी मागितली. रिप्लेमध्ये जडेजाचा पाय क्रीजच्या पांढऱ्या रेषेबाहेर असल्याचे स्पष्ट दिसले. शून्य धावेवर मिळालेल्या या जीवदानाचा पुरेपूर फायदा घेत लाबुशेनने उस्मान ख्वाजासोबत ९६ धावांची भक्कम भागीदारी रचली, ज्यामुळे ऑस्ट्रेलियाने सामन्यावर निर्णायक पकड मिळवली. या घटनेनंतर समालोचक सुनील गावस्कर आणि तत्कालीन मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी उघडपणे तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

धनंजय डिसिल्वा (श्रीलंका वि. भारत - गॉल कसोटी, २०२६): दुसऱ्या डावात विजयासाठी ३७२ धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेने सुरुवातीलाच ५५ धावांत ३ महत्त्वाचे फलंदाज गमावले होते. १६ व्या



षटकातील शेवटच्या चेंडूवर जडेजाच्या फिरकीवर श्रीलंकेचा कर्णधार धनंजय डिसिल्वाच्या बॅटची बाहेरील कड घेऊन चेंडू स्लिपमध्ये राहुल अचूक टिपला. भारताने जल्लोष सुरू केला, मात्र पंचांनी 'नो-बॉल'चा इशारा दिला. अवघ्या ७ धावांवर असताना डिसिल्वाला हे जीवदान मिळाले, ज्याच्या जोरावर त्याने किल्ला लढवत डावाला स्थैर्य दिले सोनल दिनुशा सोबत ९५ धावांची भागीदारी करत स्वतः ही अर्धशतक ठोकले.

बेन स्टोक्स व मोईन अली (इंग्लंड वि. भारत झ्र २०१६ व २०२१ मालिका): भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी सामन्यांमध्ये जडेजाने अनेकदा इंग्लंडच्या मधल्या फळीतील फलंदाजांना चकवले आहे. २०१६ च्या मोहाली कसोटीत आणि २०२१ च्या इंग्लंड दौऱ्यात बेन स्टोक्स व मोईन अली यांच्या विरुद्ध चेंडू बॅटची कड घेऊन अनुक्रमे झेलबाद व पायचीत ठरले होते, मात्र अवघ्या काही मिलीमीटरच्या फरकाने जडेजाचा पाय पुढे पडल्याने मैदानावरील बाद देण्याचा निर्णय बदलावा लागला होता.

**२. मर्यादित षटकांच्या क्रिकेटमधील (वनडे आणि टि२०) परिणाम**

पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये नो-बॉलचा फटका दुहेरी स्वरूपाचा असतो. एकतर फलंदाजाला जीवदान मिळतेच आणि दुसरे म्हणजे प्रतिस्पर्धी संघाला पुढील चेंडूवर 'फ्री-हिट' मिळते.

टी-२० आंतरराष्ट्रीय सामनेः जडेजाच्या टी-२० कारकिर्दीत फ्री-हिटच्या नियमांमुळे अनेकदा दबाव वाढलेला दिसतो. जरी २०१६ च्या टी-२० विश्वचषक उपांत्य फेरीत सिमन्सचे नो-बॉल अश्विन आणि पंड्याकडून पडले असले, तरी जडेजाच्या फिरकी गोलंदाजीवर फलंदाजाला यष्टिचीतकरण्याचे किंवा सीमारेषेवर झेल देण्याचे प्रयत्न नो-बॉलमुळे निष्फळ ठरल्याची अनेक उदाहरणे आहेत.

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने : एकदिवसीय क्रिकेटमध्ये मधल्या षटकांमध्ये जडेजा फलंदाजांवर दबाव निर्माण करतो. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडविरुद्धच्या द्विपक्षीय मालिकांमध्ये फलंदाज पुढे सरसावून खेळताना जडेजाने त्यांना यष्टिचीत केले होते, मात्र तिसऱ्या पंचांच्या तपासणीत त्याचा पाऊल रेषेच्या पलीकडे असल्याचे आढळल्याने फलंदाजांना पुन्हा खेळपट्टीवर बोलावण्यात आले.

**३. फिरकीपटू असूनही जडेजाकडून वारंवार नो-बॉल का होतात?**

एका वेगवान गोलंदाजाचा धावण्याचा मार्ग (रनअप) २०-२५ पावलांचा असतो, त्यामुळे त्याचा पाय घसरून पुढे जाणे समजण्यासारखे असते. मात्र, केवळ ४ ते ५ पावलांचा रन-अप असूनही जडेजाकडून अशा चुका का होतात, यामागे काही तांत्रिक कारणे आहेतः

अति-वेगवान आर्म अँक्शनः- जडेजा चेंडू हवेत जास्त न फिरवता वेगाने आणि सरळ टाकण्याचा प्रयत्न करतो. चेंडूला वेग आणि उसळी देण्यासाठी तो क्रीजवर शेवटचे पाऊल ताकदीने पुढे टाकतो, ज्यामुळे त्याचा पाय अनेकदा रेषेवर किंवा रेषेबाहेर पडतो.

षटक जलद पूर्ण करण्याची घाईः- जडेजा एका षटकासाठी अवघी १ ते दीड मिनिटे घेतो. फलंदाजाला विचार करायला वेळ मिळू नये म्हणून तो घाईघाईत गोलंदाजी करतो आणि या नादात क्रीजवरील नियंत्रण सुटते.

'ऑटोमेटेड नो-बॉल' तंत्रज्ञानाचा प्रभावः पूर्वी मैदानावरील पंच फिरकीपटूंच्या पावलांकडे फारसे बारकाईने पाहत नसत. मात्र, २०२० नंतर आयसीसीने प्रत्येक चेंडूवर थर्ड अंपायरद्वारे थेट 'कॅमेरा ट्रॅकिंग' सुरू केल्यामुळे जडेजाचे अगदी १-२ मिलीमीटर पुढे जाणारे पायही तात्काळ पकडले जात आहेत.

**४. आकडेवारीचा धक्कादायक वास्तव**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सांख्यिकीवर नजर टाकल्यास एक धक्कादायक बाब समोर येते. २०२१ पासून कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक नो-बॉल टाकणाऱ्या फिरकीपटूंच्या यादीत रवींद्र जडेजा ८४ पेक्षा अधिक नो-बॉलसह जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर आहे. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला पाकिस्तानचा नौमान अली (सुमारे ४० नो-बॉल) आणि तिसऱ्या क्रमांकावरील श्रीलंकेचा लसिथ एम्बुलडेनिया (सुमारे ३३ नो-बॉल) हे जडेजाच्या तुलनेत खूप मागे आहेत.

रवींद्र जडेजा हा भारताचा एक महान मॅच-विनर आणि कसोटीमध्ये ३५० हून अधिक बळी घेणारा दिग्गज अष्टपैलू खेळाडू आहे यात शंका नाही. परंतु, मोक्याच्या क्षणी त्याने टाकलेले 'नो-बॉल' आणि त्यामुळे हुकलेल्या विकेट्स हा त्याच्या देदिप्यमान कारकिर्दीतील एक असा नकारात्मक पैलू राहिला आहे, ज्याने क्रिकेटमध्ये 'इंचांचा खेळ' किती महागात पडू शकतो हे वारंवार दाखवून दिले आहे.

गॉल कसोटी भारताने जिंकली आणि मुसळधार पाऊस पाच मिनिटात सुरू झाला व दिवसभर उघडलाच नाही. मानव सुधारने फटाफट बळी मिळविल्याने भारताचा विजय साकारला. जर सुथारने बळी मिळविले नसते व पाऊस सुरू झाला असता तर रवींद्र जडेजा मोठा खलनायक ठरला असता.

- ९०९६३७२०८२

# खाद्य ठेल्याचा तडका, वाहतूकदारांचा भडका

**मी वाचक**
**शंकर सालोडकर**
**नागपूर**

शहराच्या रस्त्यांवर सायंकाळ उतरताच खाद्यपदार्थांच्या ठेल्यांची लगबग सुरू होते. चायनीज, साऊथ इंडियन, पाणीपुरी, ज्यूस, मोमोज, बियाणी, फिश फ्राय, शिकंजी, पराठे, जेवण, दाबेली अशा नानाविध पदार्थांची जणू रस्त्यांवरच मेजवानी सजते. खवय्ये नागपूरकरांसाठी ही खाद्यसंस्कृती आनंदाची पर्वणी असली, तरी त्याचवेळी शहराच्या वाहतूक व्यवस्थेची आणि स्वच्छतेची मात्र चांगलीच कोंडी होताना दिसते.

दिवसाच्या तुलनेत सायंकाळच्या वेळी या ठेल्यांची संख्या आणि गर्दी कमालीची वाढते. रस्त्याच्या कडेला, फुटपाथवर आणि अनेकदा वाहतुकीच्या मार्गालगतच थाटलेली ही दुकाने शहराच्या सौंदर्यात भर घालण्याऐवजी विद्रुपतेत भर टाकताना दिसतात. खाद्यपदार्थ तयार करताना उडणारा तेलाचा धूर, मसाल्यांच्या तडक्याचा झणझणीत वास आणि धुराचे लोट वाहनचालकांच्या नाकीनऊ आणतात. विशेषतः दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना या धुराचा मोठा त्रास सहन करावा लागतो. ठेले बंद झाल्यानंतरची परिस्थिती तर आणखी चिंताजनक असते. उरलेले तेल, भाजीपाल्याचा कचरा, अन्नपदार्थांचे अवशेष आणि निर्माल्य यांचा सडा रस्त्याच्या कडेला तसाच पडून राहतो. काही ठिकाणी दुसऱ्या दिवशीपर्यंत या कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. परिणामी दुर्गंधी, अस्वच्छता आणि डास-माशांचा उपद्रव वाढण्याची शक्यता निर्माण होते.

यात भर पडते ती बेशिस्त पार्किंगची. खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी आलेले अनेक खवय्ये आपली वाहने रस्त्यावरच अस्ताव्यस्तपणे उभी करतात. रात्रीची वाढलेली वाहतूक, त्यात रस्त्याच्या कडेला लागलेले ठेले आणि त्यासमोर उभी असलेली वाहने यामुळे अनेक ठिकाणी वाहतुकीचा वेग मंदावतो. काही वेळा किरकोळ कोंडीचे रूपांतर मोठ्या वाहतूक समस्येत होते.

प्रश्न केवळ वाहतुकीचा नाही, तर अन्नाच्या दर्जाचाही आहे. या ठेल्यांवर वापरले जाणारे खाद्यतेल, पाणी, भाजीपाला आणि इतर साहित्य दर्जेदार व सुरक्षित आहे का, याची नियमित तपासणी होते का, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. रस्त्यावर उघड्यावर तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांच्या स्वच्छतेकडे आणि आरोग्यविषयक नियमांकडे दुर्लक्ष झाले, तर चवदार मेजवानी कधी आजाराचे निमंत्रण बनेल, हे सांगता येत नाही.

काही ठिकाणी या खाद्य ठेल्यांभोवती रात्रीच्या वेळी तरुणांची गर्दी वाढते. त्यातून किरकोळ वाद, भांडणे आणि कधी कधी गुन्हेगारी स्वरूपाच्या घटनांनाही खतपाणी मिळते. त्यामुळे हा प्रश्न केवळ अतिक्रमण विभागापुरता किंवा वाहतूक पोलिसांपुरता मर्यादित राहत नाही.

खाद्य ठेले हटविणे हा या समस्येचा कायमस्वरूपी उपाय नाही. रोजगार आणि शहराची खाद्यसंस्कृती यांचा विचार करताना नियोजन, परवाना, स्वच्छता, अन्नसुरक्षा, पार्किंग आणि वाहतूक नियंत्रण या सर्व बाबींचे काटेकोर नियमन होणे गरजेचे आहे. कोणत्या रस्त्यावर किती ठेले असावेत, त्यांची निश्चित जागा कोणती असावी, ग्राहकांसाठी पार्किंगची व्यवस्था कुठे असावी आणि ठेले बंद झाल्यानंतर परिसराची स्वच्छता कोण करणार, याचे स्पष्ट धोरण असणे आवश्यक आहे.



सायंकाळच्या खाद्यपदार्थांच्या सुवासाने शहराची चव खुलावी, पण त्याचवेळी धुराच्या तडाक्याने वाहनचालकांचे डोळे पाणावू नयेत; खवय्यांची भूक भागावी, पण रस्त्यांची वाहतूक ठप्प होऊ नये; आणि खाद्यसंस्कृती फुलावी, पण शहराची स्वच्छता व आरोग्य धोक्यात येऊ नये, यासाठी संबंधित विभागांनी आता जागे होण्याची गरज आहे. शेवटी प्रश्न नागरिकांचाही आहे आणि प्रशासनाचाही. या खाद्य ठेल्यांचा विषय महानगरपालिकेने हाताळायचा, अन्नसुरक्षा विभागाने की वाहतूक व पोलिस प्रशासनाने? नागरिकांना या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आणखी किती काळ वाट पाहावी लागणार?

*'मी वाचक' या सदरात आपले मत प्रकाशित करण्यासाठी साहित्य खालील मेल आयडीवर पाठवू शकता... (ई-मेल : sinhvanivrutta@gmail.com)*

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# पूरग्रस्त नरखेड तालुक्यातील पुनर्वसित गावांसाठी

## ३२ कोटींची नागरी सुविधा कामे मंजूर, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नरखेड तालुक्यातील पुरामुळे पुनर्वसित झालेल्या गावांमध्ये विविध नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने ३२ कोटी ७ लाख ३५ हजार रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या पुढाकारामुळे मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.

या निधीतून पुनर्वसित गावांमध्ये अंतर्गत व पोहोच रस्ते, गावठाणातील गटारे, भूमिगत नाल्या, सार्वजनिक शौचालये, समाजमंदिरे, क्रीडांगणे,जिल्हा परिषद शाळांच्या संरक्षण भिंती तसेच गुरांसाठी पाण्याचे हौद उभारण्यात येणार आहेत.


संग्रहित छायाचित्र

नरखेड तालुक्यातील खैरगाव, देवळी, देवग्राम, मदना, सालाखेडा, पेठ इस्माईलपूर, महेंद्री, खरबडी, खेडी खुर्द, थडीपवनी, अंबाडा, सायवाडा आणि खारगड या गावांतील विविध नागरी सुविधा कामांचा यामध्ये समावेश आहे. या कामांसाठी एकूण ३२०७.३५ लाख रुपये, म्हणजेच ३२ कोटी ७ लाख ३५ हजार रुपयांची अंदाजपत्रकीय रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

मंजूर कामांची अंमलबजावणी जिल्हा परिषद, नागपूरच्या बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे. प्रशासकीय मान्यतेनंतर निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करून कामांना कार्यारंभ आदेश देण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. सर्व कामे १८ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

कामांची गुणवत्ता आणि निर्धारित भौतिक मानकांनुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंत्यांवर राहणार आहे.कामे पूर्ण झाल्यानंतर त्यांचे जिओ-टॅगिंग करून आवश्यक प्रमाणपत्रे सादर करण्याच्या सूचनाही शासन निर्णयात देण्यात आल्या आहेत. पूरामुळे विस्थापित झालेल्या नागरिकांच्या पुनर्वसन प्रक्रियेला गती देतानाच त्यांच्या नव्या गावांमध्ये मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा निधी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नरखेड तालुक्यातील पूरग्रस्त व पुनर्वसित गावांसाठी ३२ कोटी ७ लाख रुपयांहून अधिक निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार.

> पूरामुळे विस्थापित झालेल्या नागरिकांना केवळ सुरक्षित ठिकाणी पुनर्वसित करणे पुरेसे नाही,तर त्यांच्या नव्या गावांमध्ये दजेर्दार आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. नरखेड तालुक्यातील पुनर्वसित गावांसाठी ३२ कोटी ७ लाख रुपयांहून अधिक निधी मंजूर झाल्याने मूलभूत सुविधांना गती मिळणार आहे. ही कामे दजेर्दार आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. पूरग्रस्त नागरिकांचे जीवन पुन्हा सुरळीत करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.
>
> **– चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

## ग्रामीण भागातील रस्त्यांच्या बांधकामासाठी आ. देवतळेंनी केली मंत्र्याकडे निधीची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे**

वरोरा भद्रावती विधानसभा मतदारसंघाचे तडफदार आमदार करण देवतळे हे आपल्या मतदारसंघातील विकासासाठी युद्ध स्तरावर प्रयत्न करीत आहेत. आपल्या मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्ते बांधकामासाठी त्यांनी नुकतीच राज्याचे ग्रामविकास व पंचायत मंत्री जयकुमार गोरे यांची मुंबई येथे भेट घेऊन वरोरा भद्रावती विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्त्याची अवस्था बिकट असून हे रस्ते बांधण्याची गरज असल्याचे पत्रात विशद केले. आपल्या मतदारसंघातील इतर जिल्हा रस्ते ओडीआर व गाव रस्ते व्हिडीआर रस्त्याचे बांधकामासाठी आवश्यक निधीची मागणी त्यांनी मंत्री जयकुमार गोरे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. आमदार करण देवतळे यांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी यावेळेस आमदारांना दिले ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार सुरक्षित व बारमाही रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी तसेच गावागावातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आमदार करण देवतळे सातत्याने प्रयत्न करीत आहे.

## रेल्वे प्रवाशाला लुटणारे दोघे पाच तासांत जेरबंद

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-(धनंजय पांढरे )**

सिकंदराबाद-रायपूर एक्स्प्रेसमधून बल्लारशाह रेल्वे स्थानकावर उतरलेल्या १७ वर्षीय प्रवाशाला अडवून त्याच्याकडील २ हजार ५०० रुपयांची रोकड बळजबरीने लुटणाऱ्या दोन आरोपींना रेल्वे पोलिसांनी अवघ्या पाच तासांत ताब्यात घेतले. आरोपींकडून लुटलेली संपूर्ण रोकड जप्त करण्यात आली.



जयंत विजय लोणारे (वय १७), रा. आरमोरी, जि. गडचिरोली हा बारावीचे शिक्षण घेत असून, २० ऑगस्ट रोजी ट्रेन क्रमांक १२७७१ सिकंदराबादझ्ररायपूर एक्स्प्रेसने प्रवास करत होता. पहाटे साडेचारच्या सुमारास तो बल्लारशाह रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वर उतरला. यावेळी दोन इसमांनी त्याला अडवून पकडले आणि त्याच्या खिशातून जबरदस्तीने २ हजार ५०० रुपयांची रोकड काढून तेथून पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस चौकी बल्लारशाह येथे गुन्हा क्रमांक ४७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन रेल्वे पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखा, जीआरपी नागपूर, जीआरपी वर्धा आणि आरपीएफच्या कर्मचाऱ्यांचे संयुक्त पथक तयार करण्यात आले. पथकाने बल्लारशाह रेल्वे स्थानकाच्या काझीपेठ बाजूकडील बाहेरील परिसरात सापळा रचून आरोपींचा शोध सुरू केला.

या कारवाईत आरोपी विक्रम मनोहर नखाते (वय २५), रा. तामसवाडी, ता. तुमसर, जि. भंडाराआणि सलीम जावेद मोहम्मद हनिफ (वय ४५), रा. मोमिनपुरा, नागपूर या दोघांना अवघ्या पाच तासांत ताब्यात घेण्यात आले.

दोन्ही आरोपींना रेल्वे पोलीस चौकी बल्लारशाह येथे आणल्यानंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. तसेच फियार्दीने दोन्ही आरोपींची ओळख पटविल्यानंतर त्यांच्या ताब्यातून लुटलेली २ हजार ५०० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. पुढील कारवाईसाठी दोन्ही आरोपींना मुद्देमालासह रेल्वे पोलीस ठाणे, वर्धा येथे हजर करण्यात आले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. मंगेश शिंदे व अपर पोलीस अधीक्षक, जीआरपी नागपूर डॉ. दत्ताराम राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, जीआरपी नागपूरचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक पंजाबराव डोळे, जीआरपी वर्धाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक विरसेन चहांदे, आरपीएफ चंद्रपूरचे प्रभारी बलवीर सिंह आणि सीआयबी आरपीएफ नागपूरचे प्रभारी अमावत यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस शिपाई निकोडे, पोलीस शिपाई पंकज भांगे, पोलीस शिपाई अखिलेश चौधरी, प्रधान आरक्षक सचिन अलने, प्रधान आरक्षक भूपेंद्र बाथरी आणि सीआयबी आरपीएफ नागपूरचे एएसआय मंगेश पायघन यांनी केले.

# एकल विद्यालयातून शिक्षणासोबत देशभक्तीचे संस्कार : ना. अशोक उईके

## एकलव्य एकल विद्यालय प्रशिक्षण वर्गाला पारडसिंगा येथे प्रारंभ, १५०० शिक्षक, पर्यवेक्षकांचा सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, पारडसिंगा/नागपूर**

एकल विद्यालयाच्या शिक्षकांनी केवळ शिक्षणदूत नव्हे, तर संस्कार, आरोग्य आणि देशभक्तीचे दूत म्हणून कार्य करण्याचे आवाहन महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी केले.

दुर्गम, आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या वतीने आयोजित चार दिवसीय एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचा प्रारंभ गुरुवारी सती अनुसया माता देवस्थान, पारडसिंगा (ता. काटोल) येथे झाला. वर्गात १५०० शिक्षक, पर्यवेक्षकांचा सहभाग आहे. महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.




कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत संघचालक दीपकराव तामशेट्टीवार, आमदार चरणसिंग ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर उपाध्यक्ष राजीव हडप, सचिव प्रशांत बोपर्डीकर, कोषाध्यक्ष सीए मिलिंद कानडे, विश्वस्त मुरलीधर चांदेकर, उपेंद्र कोठेकर, सुधीर दिवे, अनिल जोशी, अतुल मोहरिल, किशोर रेवतकर, रेखा मावसकर आदी उपस्थित होते.

उईके म्हणाले, गोरगरीब आणि दुर्गम भागातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, या ध्येयाने लक्ष्मणराव मानकर यांनी ही संस्था सुरू केली. या प्रशिक्षण वगार्तून शिक्षकांना प्रोत्साहन मिळते, त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो आणि चुका सुधारण्याची संधी मिळते. दुर्गम भागातील समाज अशिक्षित राहू नये आणि त्यांच्यावर योग्य संस्कार व्हावेत, यासाठी संस्था समर्पण भावनेने कार्य करीत आहे.

आमदार चरणसिंग ठाकूर यांनी समाजघडणीसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या लक्ष्मणराव मानकर यांच्या कार्याचा गौरव केला. अतुल शिरोडकर यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याचा ढावा घेतला. प्रत्येक गावातील शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्तीची ज्योत रुजविण्याचे काम करीत आहेत, असे त्यांनी सांगितले.

२० ते २३ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या प्रशिक्षण वर्गात शिक्षक व पर्यवेक्षकांना विविध विषयांचे प्रशिक्षण दिले जात आहे. दुर्गम व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी शिक्षकांची कार्यक्षमता, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. भारत भुजाडे यांनी सूत्रसंचालन केले.

### राष्ट्राच्या उभारणीत जनजाती समाजाचे योगदान महत्त्वाचे - दीपक तामशेट्टीवार

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत संघचालक दीपकराव तामशेट्टीवार म्हणाले, राष्ट्राच्या उभारणीत जनजाती समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. देशावर आलेल्या संकटांच्या काळात तसेच स्वातंत्र्यलढ्यात जनजाती समाजाने मोठी भूमिका बजावली. कोणतेही राष्ट्र केवळ शासनाच्या आधारावर टिकत नाही, तर कायदे व नियमांचे पालन करणारा सशक्त समाज उभा राहणे आवश्यक आहे. शासनाने सुविधा आणि साधने उभी करावीत; मात्र समाजातील प्रत्येक घटकाने राष्ट्राच्या सुरक्षेची आणि उभारणीची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

### २३ रोजी गडकरी यांच्या उपस्थितीत समारोप

या प्रशिक्षण वगार्चा समारोप रविवारी, २३ ऑगस्ट रोजी अनुभव कथन कार्यक्रमानंतर सायंकाळी ६ वाजता होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी अध्यक्षस्थानी राहणार असून महावीर महात्मा पुरस्कारप्राप्त आणि जयगंगा कोचिंग (ओ.पी.सी.) प्रा. लि., ओडिशाचे संस्थापक किरण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

थोडक्यात

## गार्डन कोर्ट सोसायटीच्या अध्यक्षपदी अजय कनोजे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बेलतरोडी गावालगतच्या गार्डन कोर्ट अपार्टमेंट हाऊसिंग सोसायटीची नोंदणी सहकार खात्याने मंजूर केली असून, अध्यक्ष अजय कनोजे यांच्यासह १३ सदस्यीय हंगामी कार्यकारिणी एक वषार्साठी निवडण्यात आली आहे. ज्येष्ठ पत्रकार विनोद देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या आमसभेत, सहायक सहकार निबंधक आर. आर. वाटाणे यांच्या देखरेखीखाली ही निवडणूक झाली. यावेळी सहकार खात्याचे भोयर, तसेच समन्वयक राजू काटोरे हेही उपस्थित होते.

सचिव : चंद्रशेखर प्रधान, कोषाध्यक्ष : निखिल बांगडे, कार्यकारिणी सदस्य : संदीप बेनेगल, नितीन मेमाने, मिलिंद क्षीरसागर, दीपक वहाल, उमाकांत रोडे, आनंद हेडाऊ, पराग लिंगावार, योगेश राऊत, प्रीती पवार, डॉ. कीर्ती बिहारे यांची नव्या पदाधिकारी अशी नियुक्ती करण्यात आली आहे.

## 'श्रावण सरी' सांस्कृतिक सोहळ्यात प्रांतिक नृत्य स्पर्धेचे आयोजन शनिवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

तेली समाजातील भगिनी- बंधूंसाठी 'घे भरारी - जवाहर महिला मंच' यांच्या वतीने 'श्रावण सरी' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सांस्कृतिक सोहळा शनिवार, २२ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता. जवाहर विद्यार्थी गृह, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. 'मिले सूर मेरा तुम्हारा' या संकल्पनेवर आधारित प्रांतिक नृत्य स्पर्धा हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण राहणार आहे.

विविध कलाविष्कारांच्या माध्यमातून सामाजिक एकोपा व सांस्कृतिक विविधतेचा संदेश देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार असून, उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचेही आयोजन करण्यात आले आहे. तेली समाजातील सर्व बंधू-भगिनींनी सहकुटुंब उपस्थित राहून कलाकारांचा उत्साह वाढवावा आणि या सांस्कृतिक सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाचे आयोजन मृणाल मोक्कदम, अध्यक्षा - जवाहर महिला मंच यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रज्ञा बडवाईक आहेत. जवाहर विद्यार्थी गृहाचे संचालक यांचीही यावेळी उपस्थिती राहणार आहे. आपली उपस्थिती हाच आमचा आनंद, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## मौदा येथे सद्भावना दिवस साजरा
### माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

स्थानिक जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मौदा येथे माजी पंतप्रधान भारत रत्न राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिवस म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक अनिल मेश्राम यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी शाळेचे पर्यवेक्षक मस्के सर, पर्यवेक्षक नासरे सर, कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक, सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक गभने सर यांनी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जीवनकार्यावर आणि देशाच्या विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानावर आपले विचार व्यक्त केले.

त्यांनी राजीव गांधी यांच्या आधुनिक भारताच्या निर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकला. कार्यक्रमादरम्यान शाळेचे पर्यवेक्षक मस्के सर यांनी जागतिक मच्छर दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. डासांमुळे होणारे डेंग्यू, मलेरिया यांसारखे आजार, त्यांची कारणे तसेच डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी परिसरात स्वच्छता राखण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले

## निसर्ग बैठकच्या पहिल्या सत्रात 'वृक्ष कायदा- वृक्षांनाही हक्क आहेत' विषयावर संवाद आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

निसर्ग, वन्यजीव आणि पर्यावरणाशी संबंधित विषयांवर अर्थपूर्ण संवाद घडवून आणण्याच्या उद्देशाने वाईल्ड अजाईल फाउंडेशनतर्फे निसर्ग बैठक या नवीन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत पहिल्या सत्राचे आयोजन वृक्ष कायदा-वृक्षांनाही हक्क आहेत, या विषयावर करण्यात आले आहे. शनिवारी २२ ऑगस्ट ला सायंकाळी ५ ते ७ वाजता. बर्डी येथील पूर्व विदर्भ महिला परिषद सभागृह, व्हिबग्योर स्कूलजवळ, मेट्रो पिलर क्रमांक २८१ समोर, हे सत्र होणार आहे. पर्यावरण विषयक कायद्यांच्या माध्यमातून वृक्ष संरक्षण कशा प्रकारे केले जाते, वृक्ष कायद्याचे महत्त्व काय आहे आणि वृक्षांबाबत नागरिकांनी कोणत्या बाबी जाणून घेणे आवश्यक आहे, याबाबत या सत्रात मार्गदर्शन करण्यात येईल. या सत्रासाठी पर्यावरण विषयक कायदेतज्ज्ञ कृष्णा अग्रवाल प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहतील. त्यांच्या मार्गदर्शनातून वृक्ष संरक्षणाशी संबंधित कायदेशीर बाबी तसेच नागरिकांची भूमिका यावर संवाद साधला जाणार आहे. निसर्ग बैठक हा वाईल्ड अजाईल फाउंडेशनचा नियमित संवादात्मक उपक्रम असून, चर्चासत्रे, चित्रपट, कला, अनुभव आणि संवादाच्या माध्यमातून निसर्ग, वन्यजीव व पर्यावरणाशी संबंधित विविध विषय समजून घेण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

निसर्ग समजून घेणे हीच त्याच्या संवर्धनाची पहिली पायरी आहे, या विचारातून या उपक्रमाची संकल्पना साकारण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून इच्छुकांनी पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना विनंतीनुसार सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. या उपक्रमाच्या पहिल्या सत्रासाठी पूर्व विदर्भ महिला परिषद आणि त्यांच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले आहे.

थोडक्यात

## उमरेड येथे संघटनेची जिल्हा त्रैमासिक सभेला उत्तम प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उमरेड शाखेची आम सभा " विठोबा सभागृह येथे अशोकराव दगडे यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली . याप्रसंगी जिल्हा कार्यकारीणीचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सभेचे प्रास्ताविक ५ मार्गदर्शन दिपक सावळकर जिल्हा सरचिटणीस यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीराम वाघे यांनी केले. सभेला राज्य प्रतिनिधी विनोद राऊत, संजय भेंडे, रमेश बिरणवार, नरेंद्र गोळे , नबी शेख , मधूकर फरतोडे, किष्णा बगडे, तभाने सर, जयदेव टाले, विजय धनालकोटवार सर्व तालूका सचिवांनी एकनाथ मांडवे, बी एन लिखार, बेंडे सर मौदा, यांनी आपापल्या शाखेचे अहवाल वाचन केले व संघटनात्मक बाबीवर सखोल विवेचन झाले विशेषता पेन्शन अदालत बहिष्कार, स्थगित झालेले आंदोलन, या तिन महिन्यात संघटनेने केलेले कार्य, इत्यादी बाबीवर मार्गदर्शन व प्रभावी चर्चा घडविण्यात आली.

यात अध्यक्ष अशोक दगडे, सरचिटणीस दिपक सावळकर, कार्याध्यक्ष सरिता किंमतकर, राज्यप्रतिनिधी विनोद राउत मुख्य समन्वयक संजय भेंडे, संघटन सचिव दिपक तिडके, मुख्यसंघटक रामदास काकडे, उमरेड तालूका अध्यक्ष बी एन लिखार, येवले सर महिला सचिव सुनिता दामले, यांनी व्यासपिठावरून मार्गदर्शन केले, तर गंगाधर मुसळे, बेबीताई रोडे, माणिकराव ठाकरे यांनी चर्चेत सहभाग घेतला. आभार प्रदर्शन उमरेडच्या जिल्हा प्रतिनिधी बारस्कर मॅडम यांनी केले. सभेला सुमारे १५० सभासद व पदाधिकारी उपस्थित होते. ही सभा यशस्वकरण्याकरिता उमरेडचे अध्यक्ष लिखार सर यांचे नेतृत्वात सर्व शाखेच्या पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## काटोल येथे राष्ट्रसंतांच्या क्रांतीज्योतीचे भव्य स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

गुरुकुंज आश्रम, मोझरी येथून निघालेली क्रांतीज्योत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बनारसीदास रुईया हायस्कूल, काटोलच्या प्रांगणामध्ये आली असता उपमुख्याध्यापक श्री हिरामण सोमकुवर, पर्यवेक्षक प्रा. अजय खडसे व सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी तिचे स्वागत केले. याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात क्रांतीज्योतीचे औचित्य व वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे क्रांतिकार्य यावर प्रकाश टाकण्यात आला. क्रांतीज्योती सोबत आलेले निळकंठदादा कळंबे,डॉ. ज्ञानेश्वर मुडे, राजेंद्र गाडगे, बाबाराव दोहतरे, अवीदादा राऊत, पाटील व सर्व प्रचारकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी रत्नाकर बोंद्रे व दिलीप वरोकर यांची विशेष उपस्थिती लाभली. मागच्या वर्षी ग्रामगीता जीवन विकास परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौस्तुभ पवार प्रास्ताविक ग्रामगीताचार्य सुरेश राठोड यांनी केले. आभार प्रदर्शन भोजराजन चंदन यांनी केले. शेवटी राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी धीरज ढोले, विश्वेश्वर कोरडे, पराग करांडे, नारायण कावडकर, भास्कर सिरसाट, अमित कोट्टेवार, नितिन बनसोड, सतिश महल्ले, बांबल, लिना राखोंडे मॅडम, हर्षलता थोटे ,गिरडकर मॅडम, निरूपमा लांडे या सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

## कारच्या काचा फोडून अडीच लाख लंपास, वरोरा येथील घटना

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**

वरोरा शहरातील वर्दळीच्या ठिकाणी आपल्या कारमध्ये पैशाची बॅग ठेवून बँकेत चेक भरण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीच्या कारमधून चोरांनी अडीच लाख रुपये पळविल्याची घटना गुरुवारी २० ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास घडली. माजरी येथील निलेश नथुजी भेले हे प्रॉपर्टी डीलरचे काम करतात. गुरुवारला दुपारच्या सुमारास आंबेडकर चौकातील एचडीएफसी बँकेमध्ये ते आपल्या कारणे आले व कार पार्किंगमध्ये लावली. कारमध्ये अडीच लाख रुपये असलेली एक बॅग ठेवून ते बँकेमध्ये भरण्यासाठी गेले परत आले असता त्यांना कालच्या समोरची काच फुटलेली आढळली आणि त्यातील अडीच लाख रुपये चोरल्याचे लक्षात आले. लगेच या घटनेची निलेश भेले यांनी वरोरा पोलिसात तक्रार दाखल केली आहे पुढील तपास वरोरा पोलीस करीत आहे.

## थकीत मालमत्ता कर वसुलीच्या मोहिमेला सुरूवात, सर्व झोनमध्ये ४०० कर्मचारी तैनात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

थकीत मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने धडक मोहिम सुरू केली आहे. शहरातील १० झोनमधील थकीत मालमत्ता कराच्या वसुलीच्या मोहिमेला सुरूवात झाली आहे. ही मोहिम येत्या ३० सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. यात पहिल्याच दिवशी १ कोटी ७७ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. मोहिमेअंतर्गत १ हजार कोटी रुपये थकीत मालमत्ता कर वसूल करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे व सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर तथा कर संकलन समिती सभापती सरिता कावरे यांनीही नागरिकांना थकीत मालमत्ता कर भरण्याचे आवाहन केले आहे.

# गोकुळपेठ बाजाराच्या पुनर्विकासात प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न !

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दुकानदार व गाळेधारकांसोबत साधला संवाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गोकुळपेठ येथील जुन्या बाजाराच्या पुनर्विकासाचा प्रकल्प हा छोट्या उद्योजकांसह प्रत्येक दुकानदार व गाळेधारकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आहे. या प्रकल्पाच्या उभारणीत प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न होईल, असे आश्वासन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिले.

गडकरी यांच्या महाल येथील कार्यालयात शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी गोकुळपेठ मार्केटमधील दुकानदार व गाळेधारकांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला महापौर नीता ठाकरे, सत्तापक्षनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी, मनपा आयुक्त डॉ. विपिन इटनकर, नासुप्रचे सभापती संजय मिणा यांची उपस्थिती होती. यावेळी गोकुळपेठ मार्केटमधील दुकानदार व गाळेधाकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्याशी संवाद साधताना गडकरी यांनी विविध प्रश्नांची उत्तरे दिली. त्यावर दुकानदारांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाला सहकार्य करण्याची तयारी देखील दाखवली.

१ लाख ५२ हजार ९०८ चौरस फुट (३.५१ एकर) एवढ्या जागेत हा प्रकल्प उभा होत आहे. यामध्ये आधीपासून विविध व्यवसाय करणारी दुकाने व अनेक व्यावसायिक गाळेधारक देखील आहेत. ना. गडकरी यांनी सांगितले की, नागपूर शहरात कॉटन मार्केट, संत्रा मार्केट, बुधवार बाजार, दही बाजार असे जवळपास १५ ते १६ मार्केट्स उभे होत आहेत. याठिकाणी सर्वसोयीसुविधा, स्वच्छता, पार्किंग आदी गोष्टींवर भर दिला जात आहे. यामध्येच गोकुळपेठ मार्केटचाही समावेश आहे. तीन वर्षांमध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवण्यात आले आहे.

यादरम्यान रोजच्या व्यवसायावर पोट असलेल्या दुकानदारांचे नुकसान होणार नाही, याचाही प्रयत्न केला जाणार आहे. हॉकर्सचाही विचार करण्यात येणार आहे.

३१ माळ्यांच्या इमारतीमध्ये प्रवेश करण्यासाठी सहा मोठे प्रवेशद्वार असणार आहेत. आज सद्यस्थितीत ओट्यावर भाजी विक्री करणाऱ्यांना तळमजल्यावर दुकाने देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच नियम आणि अटींच्या संदर्भात कुठलाही गैरसमज होऊ नये याकरिता प्रत्येक दुकानदार व गाळेधारकांसोबत सामंजस्य करार करण्यात येईल. त्यासाठी सर्वांना सहकार्य करावे, असे आवाहन गडकरी यांनी केले. यावेळी काही दुकानदार व गाळेधारकांनी आपले प्रश्न गडकरी यांच्यापुढे मांडले व मिळालेल्या उत्तरावर समाधान मानले.

## पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आकृतीबंध विकास आराखडा तयार करा: पालकमंत्री उईके

### जिल्हा नियोजन भवनात पारधी आढावा बैठक संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

वर्षानुवर्षे रानावनात राहून वन्यप्राणी पशुपक्ष्यांची शिकार करून त्यावर आपली उपजीविका भागवणाऱ्या आदिवासी पारधी समाजाच्या परंपरागत व्यवसायावर बंदी आल्याने पारधी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील पारधी समाजासाठी आकृतीबंध विकास आराखडा तयार करण्याचे आदेश आदिवासी विकास मंत्री तथा पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा ना डॉ अशोक वुईके यांनी जिल्हा नियोजन भागामध्ये आयोजित बैठकीमध्ये जिल्हा प्रशासनाला आदेश दिले.

चंद्रपूर जिल्ह्यातील पारधी समाज हा विकासापासून कोसो दूर आहे पारधी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी आदिवासी पारधी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष धर्मेंद्र शिरकुरे हे प्रशासन तसेच लोकप्रतिनिधी आमदार खासदार व मंत्र्यांना भेटून निवेदने देऊन मागणी करत असतात त्या निवेदनाची दखल घेत आदिवासी विकास मंत्री ना डॉ अशोक वुईके यांनी पारधी समाजाचा सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकारी वसुमना पंत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार चिमूरच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती कुंमरे यावेळी उपस्थित होते. यावेळी खालील मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.ज्या पारधी वस्तीची लोकसंख्या ३०० आहे, त्या गावाला महसूल ग्राम किंवा वनग्राम घोषित करून विकास घडवून आणावा.पारधी सुशिक्षित बेरोजगारांना युवकांना जंगल,वनांविषयी ज्ञान असल्याने त्यांना ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात गाईड म्हणून नोकरी द्यावी.



वरोरा तालुक्यातील १) चीनोरा पारधी टोला येथे बाल संस्कार केंद्र मंजूर करावे.२) निवासी अतिक्रमण जमिनीचे पट्टे नियमाकुल करून द्यावे.३) समाज भवन, क्रांतिवीर समशेर सिंग पारधी या नावाने सभागृह बांधकाम करावे.४) वरोरा तालुक्यातील चिनोरा पारधी टोला,येवती टोला,हिरापुर बेडा,नागरी पारधी टोला येथे आरो फिल्टर मंजूर करावे. ५)कोंढाळा पारधी टोला येथील लोकांना वन जमिनीचे पट्टे देण्यात यावे.६) मजरा पारधी टोला येथील लोकांना राहत्या घराचे पट्टे देण्यात यावे. तसेच नागभीड तालुक्यातील चिंधी माल येथील पारधी लोकांचे स्थलांतर थांबवावे त्यांना रोजगार उपलब्ध करून द्यावा व राहत्या घराचे निवासी नियमाकुल पट्टे करून द्यावे.राजुरा तालुक्यातील पाचगाव पारधी गुडा येथील लोकांना स्मशानभूमी करिता शासकीय जागा उपलब्ध करून देण्यात यावी तसेच शौचालय बांधकाम करून देण्यात यावे.

कोरपणा तालुक्यातील धोपटाळा पारधीगुडा येथील लोकांना अनेक वर्षांपासून वहीवाट अतिक्रमित गायरान जमिनीचे पट्टे व घराचे पट्टे नियमाकुल करून देण्यात यावे, तसेच शबरी घरकुल योजनेअंतर्गत बेघर लोकांना घरकुल मंजूर करावे अशा आशयाचे निवेदन पालकमंत्री अशोक वुईके व जिल्हाधिकारी वसुमना पंत यांना देण्यात आले आहे यावेळी आदिवासी पारधी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष धर्मेंद्र शेरकुरे, विदर्भ पारधी विकास परिषद चे महामंत्री प्रविण पवार, सरपंच तथा संघटनेचे सदस्य वनिष घोसले, दिवाकर नन्नावरे, पत्रकार जगदीश पेंदाम, करण रमेश शेरकुरे,राजेश शेरकुरे, विजय नन्नावरे, प्रदीप धारणे ,देवेंद्र धारणे, विकास काळे,अमीर शेरकुरे,गजानन पवार, श्रीकृष्ण शेरकुरे आदिंची उपस्थिती होती.

## अर्धवट वंदे मातरम् गीतावरून महापौरांचे आयुक्तांना चौकशीचे आदेश

### वंदे मातरम्च्या गायनाची कार्यपद्धती निश्चित करावी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या २० ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत राष्ट्रीयगीत वंदे मातरम्ची अर्धवट ध्वनीफित (ऑडीओ क्लिप) वाजविण्याच्या घटनेच्या संदर्भात महापौर निता ठाकरे यांनी आयुक्त डॉ. विपीन यांना तात्काळ चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकारासाठी जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई का करण्यात येऊ नये, अशी कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश पत्राद्वारे दिले आहेत. मनपाच्या सर्वसाधारण किंवा विशेष बैठकीची सुरूवात राष्ट्रीयगीत वंदे मातरम्ने करण्याची परंपरा प्रचलित आहे.



केंद्र सरकारने वंदे मातरमच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून सर्व शासकीय कार्यक्रमांमध्ये वंदे मातरमचे सर्व सहा कडवे गायनाच्या संदर्भात घटनादुरुस्ती केली आहे. यामुळे सर्व शासकीय कार्यक्रमामध्ये आता वंदे मातरमची सहा कडवे गायन आवश्यक झाले आहे.

मात्र गेल्या २० ऑगस्टला झालेल्या मनपाच्या सर्वसाधारण सभेच्या सुरूवातीला वंदे मातरम्ची पहिली दोन कडव्यांचीच ध्वनीफित वाजविण्यात आली आहे, याकडे महापौरांनी आयुक्तांचे लक्ष वेधले आहे. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्वपूर्ण प्रेरणास्थान राहिलेल्या या राष्ट्रीयगीताचा उचित सन्मान व आदर राखणे अपेक्षित आहे. मनपाच्या सर्वसाधारण बैठकीत अर्धवट वंदे मातरम्ची ध्वनीफित वाजणे ही बाब उचित नसून, यासंदर्भात या हलगर्जीपणासाठी जबाबदार व्यक्तींवर कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्यावर कारवाई कां करण्यात येऊ नये, अशी नोटीस बजावावी. यापुढे असा प्रकार घडणार नाही. यासाठी वंदे मातरम्गायनाची कार्यपद्धतीन निश्चित करावी, असेही निर्देश महापौर ठाकरे यांनी आयुक्तांना दिले आहेत.

# कपाशीवर किडींचा हल्ला, फवारणी करूनही रोगराई हटेना!

### मावा, तुडतुडे, पांढऱ्या माशीचा वाढता प्रादुर्भाव; उत्पादन घटण्याची शेतकऱ्यांना धास्ती

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात कपाशी पिकावर मावा, तुडतुडे, पांढरी माशी यांसह विविध किडींचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी वर्गाची चिंता वाढली आहे. किडींच्या नियंत्रणासाठी वारंवार फवारण्या करूनही अपेक्षित परिणाम मिळत नसल्याने शेतकरी अक्षरशः हैराण झाले आहेत. एकीकडे वाढता उत्पादन खर्च आणि दुसरीकडे पिकावर येणारे संकट यामुळे कपाशी उत्पादक शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.



तालुक्यातील अनेक गावांमध्ये कपाशीच्या पिकावर मावा, तुडतुडे आणि पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. पानांवर किडींचा प्रादुर्भाव झाल्याने पाने आकसणे, पिवळसर पडणे, झाडांची वाढ खुंटणे अशी लक्षणे काही शेतांमध्ये दिसत आहेत. परिणामी कपाशीच्या वाढीवर परिणाम होऊन पुढील काळातील फुलधारणा व बोंडधारणेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पावसाच्या अनियमिततेमुळे आधीच शेतकरी अडचणीत असताना आता किडींच्या प्रादुभार्वाने त्यांच्या खर्चात आणखी भर पडली आहे. महागडी कीटकनाशके खरेदी करून शेतकरी वारंवार फवारणी करीत आहेत. फवारणीसाठी मजुरी, औषधांचा खर्च आणि इतर निविष्ठांचा खर्च वाढत असल्याने कपाशीचा उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत आहे.

एका फवारणीनंतर काही दिवसांतच पुन्हा किडींचा प्रादुर्भाव जाणवत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे फवारणी करू करू शेतकरी थकले, मात्र किडी काही हटता हटेनात, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. योग्य कीटकनाशकाची निवड, फवारणीची योग्य वेळ आणि प्रमाण याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे.

कपाशी सध्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यात आहे. या काळात किडींचा प्रादुर्भाव नियंत्रणात आला नाही तर झाडांची वाढ, फुलधारणा आणि बोंडधारणा प्रभावित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी उत्पादनाबाबत शेतकऱ्यांच्या मनात धाकधूक निर्माण झाली आहे. कपाशीवरील किडींचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता कृषी विभागाने तालुक्यातील प्रभावित गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना बांधावर मार्गदर्शन करावे, अशी मागणी होत आहे. किडीची अचूक ओळख करून त्यानुसार उपाययोजना करण्याबरोबरच अनावश्यक व वारंवार फवारण्या टाळण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे.

कपाशीच्या लागवडीपासून आतापर्यंत शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. त्यात आता कीटकनाशकांच्या फवारण्यांचा अतिरिक्त खर्च वाढत आहे. बाजारातील औषधांच्या किमती वाढल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांवर आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे किडींचा बंदोबस्त करून पिकाचे उत्पादन वाचविणे हे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरले आहे.

तालुक्यात कपाशीचे मोठे क्षेत्र असल्याने कृषी विभागाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सर्वेक्षण करावे, शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे आणि किडींच्या प्रादुभार्वावर प्रभावी नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी कपाशी उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.

कपाशीवर किडींचा प्रादुर्भाव वाढल्याने वारंवार फवारणी करावी लागत आहे. औषधांचा खर्च वाढला असून फवारणी करूनही काही दिवसांनी पुन्हा किडी दिसून येतात. पिकाची वाढ आणि पुढील उत्पादनाबाबत चिंता वाटत आहे. कृषी विभागाने प्रत्यक्ष शेतात येऊन योग्य मार्गदर्शन करावे.

**- मंगेश वटाणे, शेतकरी-रामठी**

कपाशीचे पीक चांगले येईल अशी अपेक्षा होती; मात्र सध्या मावा, तुडतुडे आणि पांढऱ्या माशीचा त्रास वाढला आहे. फवारणीवर मोठा खर्च होत असून उत्पादन खर्चही वाढत आहे. किडींचे वेळीच नियंत्रण झाले नाही तर कपाशीच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. शासन व कृषी विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात.

**- मोहन सेंबेकर, शेतकरी-मेंढला**

पावसातील खंड तसेच वातावरणातील बदलामुळे कपाशी पिकावर विविध किडी व रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. सध्या मावा, तुडतुडे यांसारख्या किडींच्या प्रादुभार्वाबाबत शेतकऱ्यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. किडी व रोगांच्या प्रभावी नियंत्रणासाठी सहाय्यक कृषी अधिकारी शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करीत असून, गावपातळीवर बैठका घेऊन आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली जात आहे. शेतकऱ्यांनी पिकाची नियमित पाहणी करून किडींचा प्रादुर्भाव आढळल्यास कृषी विभागाशी संपर्क साधावा.

**-कार्तिक कोळी, तालुका कृषी अधिकारी, नरखेड**

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शनिवार, २२ ऑगस्ट २०२६

थोडक्यात

## अनियंत्रित कारची दुचाकीला जोरदार धडक, दाम्पत्य जखमी



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर - धनंजय पांढरे**

बल्लारपूर-चंद्रपूर महामार्गावरील एपीजे अब्दुल कलाम गार्डनजवळील वळणावर अनियंत्रित कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याची घटना २० ऑगस्ट रोजी दुपारी २.४५ वाजता घडली. या अपघातात दुचाकीस्वार सुरज खिरटकर २३ वर्ष आणि त्यांची पत्नी दिपाली खिरटकर २० वर्ष रा. चंद्रपूर, हे दोघे जखमी झाले. सुदैवाने या दुर्घटनेत जीवितहानी टळली. सुरज खिरटकर हे पत्नीसमवेत स्कूटी क्रं एमएच ३४ सीटी ६२९९ ने बल्लारपूरहून चंद्रपूरकडे जात होते. याचवेळी कोठारी येथील ईशांत वांढरे १९ वर्ष हा कार क्रं एमएच ३४ बीआर ९८९५ ने चंद्रपूरच्या दिशेने जात होता. एपीजे अब्दुल कलाम गार्डनजवळील वळणावर कार अनियंत्रित होऊन दुचाकीला धडकली. धडकेनंतर दुचाकी रस्त्यालगतच्या भिंतीवर जाऊन आदळली. अपघाताची माहिती मिळताच टोलनाक्यावरील रुग्णवाहिकेने घटनास्थळी धाव घेत जखमी दाम्पत्याला चंद्रपूर येथील सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

दरम्यान, या मार्गावर रस्त्याचे काम सुरू असून वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी सूचना फलक लावण्यात आले आहेत. असे असतानाही वाहन वेगाने चालविल्याचा आरोप होत आहे. अवघ्या १९ वर्षीय युवकाच्या हातात कार देण्यात आल्याने त्याच्या वाहनचालक क्षमतेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. वेळीच नियंत्रण न मिळाल्यास या अपघातात मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. त्यामुळे वाहनचालकांच्या निष्काळजीपणावर नियंत्रण आणण्याची मागणी होत आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## मोरेश्वर घोडे कृषी प्रेरणा पुरस्काराने सन्मानित




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अँग्रोकेअर ग्रुप ऑफ कंपनीज नाशिकच्या वतीने कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळा नुकतेच बुधवार दिनांक १९ ऑगस्ट रोजी नाशिक येथील हॉटेल मिथिला प्राईड येथे निवृत्त कृषी संचालक डॉ. कैलाश मोते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमाला सेलिब्रिटी गेस्ट म्हणून मराठी अभिनेत्री स्मिता प्रभू यांची उपस्थिती लाभली होती. अतिथी म्हणून या कार्यक्रमाला रूपाली भालके (उपजिल्हाधिकारी, महसूल, रविंद्र माने (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी) तसेच अभिमन्यू काशीद, (प्रकल्प संचालक, आत्मा, नाशिक) आबासाहेब मोरे, (संचालक, कृषी संशोधन चॅरिटेबल ट्रस्ट) यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन भूषण निकम तसेच रोहिणी पाटील यांनी केले होते.

या सोहळ्यात रामटेक येथील संत कबीर एग्रो सर्विस आणि माती परीक्षण केंद्राचे संचालक मोरेश्वर वसंतराव घोडे स्व. वसंतराव नाईक कृषी प्रेरणा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या उपलब्धीबद्दल मोरेश्वर यांचे तेजराम घोड़े, कवी लीलाधर दवंडे, सचिन वालोकर, शैलेश खोबरागड़े, आशु घोड़े, मोनू रोखडे, सीताराम वरखड़े, सुनील मानकर, कार्तिक दवंडे , जगदीश लेंड, प्रकाश लेंड मनोज बंधाते, जयेश घोड़े, आर्यन मेंघरे, आयुरी मेंघरे, महेंद्र वालोकर आदींनी अभिनंदन केले आहे.

## ताथवडे शाळेत रंगभरण स्पर्धेचे आयोजन डॉ. डी. वाय. पाटील आर्किटेक्चर कॉलेज आकुर्डी यांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताथवडे येथे पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील आर्किटेक्चर कॉलेज आकुर्डी यांजकडून रंगभरण स्पधेर्चे



आयोजन करण्यात आले. यावेळी विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

उपक्रमशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताथवडे येथे डॉ. डी. वाय. पाटील आर्किटेक्चर कॉलेज आकुर्डी यांच्यातर्फे रंगभरण स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कु. विधी संतोष तायडे प्रथम, कु. दीप्ती राजेश पारडे द्वितीय तर कु. सिद्धप्पा पंडित भोज याने या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या विद्यार्थ्यांना शालेय वस्तू भेट देण्यात आल्या.

या स्पर्धेचे संयोजन डॉ. स्नेहा शर्मा, ए. आर. सीमा नाकील, गायत्री पाटोळे, वैष्णवी चौधरी, अनुजा गडकर यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी, कविता मोहिते, भारती जाधव, जयश्री दांगडे, सारिका भालेकर, शिवप्रसाद गुट्टे आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते. मारुंजी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश साबळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. गटशिक्षणाधिकारी संग्राम पाटील आणि गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी केले. तर मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यांच्या शेतीकामासाठी माती-मुरुमावर आता रॉयल्टी नाही

### ट्रॅक्टरही कारवाईतून मुक्त, भूतकाळाच्या गप्पांपेक्षा वर्तमान आणि भविष्याची चिंता करा, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शेतजमिनीचे सपाटीकरण, शेतरस्ते व वहिवाटीचे रस्ते तयार करणे, तसेच शेतीच्या उपयोगासाठी जमीन तयार करण्यासाठी लागणारी माती आणि मुरूम यावर आता शेतकऱ्यांना कोणतीही रॉयल्टी भरावी लागणार नाही. या कामासाठी शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरवर तलाठी, तहसीलदार किंवा पोलिसांकडून कारवाई केली जाणार नाही, असे महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.

नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे यांनी राज्याच्या वाळू धोरणासंदर्भात ही माहिती दिली. यापूर्वी माती किंवा मुरूम वाहतूक करताना शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरवर कारवाई करून मोठ्या प्रमाणात दंड आकारला जात असल्याच्या तक्रारी होत्या. आता शासनाने शेतकऱ्यांच्या शेतीविषयक गरजा लक्षात घेऊन हा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. शेतात सपाटीकरण करणे, शेतरस्ता किंवा वहिवाटीचा रस्ता तयार करणे, शेतात घर बांधणे अथवा शेतीयोग्य जमीन तयार करणे यासाठी लागणाऱ्या गौण खनिजावर रॉयल्टी आकारली जाणार नाही. अशा कामासाठी माती कुठून आणली याबाबत स्वतंत्र मंजुरीची आवश्यकता राहणार नाही, असेही बावनकुळे म्हणाले.

मात्र, महसुली नाल्यातून माती काढायची असल्यास तलाठ्याची परवानगी घेणे आवश्यक राहील. शेतकऱ्यांच्या शेतीकामासाठी वापरल्या जाणाऱ्या माती-मुरुमावर मात्र रॉयल्टी आकारली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

**भूतकाळाच्या गप्पांपेक्षा वर्तमान आणि भविष्याची चिंता करा**

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी २०१४ मध्ये भाजपकडून सरकार स्थापनेची ऑफर मिळाल्याच्या केलेल्या दाव्यावर बावनकुळे यांनी टीका केली. मग त्यावेळी का नाही सरकार बनवले? कोणी मनाई केली होती? शिळ्या भाकरी का खाता? आता वर्तमानाबद्दल बोला. भविष्यात कोणी काय केले याची आत्मकथा लिहावी, मात्र माध्यमांमध्ये अशा पुड्या सोडणे योग्य नाही, असे ते म्हणाले. भूतकाळावर कोणी विश्वास ठेवत नाही. वर्तमान आणि भविष्याची काळजी घेण्याची गरज आहे, असा टोला त्यांनी चव्हाणांना लगावला.

**राहुल गांधींचा बेस ढासळला**

राहुल गांधी यांच्या आंदोलनावरही बावनकुळे यांनी टीका केली. राहुल गांधींचा बेस ढासळला आहे. गर्दी जमा होत नाही, मान्यता मिळत नाही. त्यामुळे एखादा मुद्दा हातात घेऊन काहीतरी होईल, या अपेक्षेने त्यांचे राजकारण सुरू आहे, अशी टीका त्यांनी केली.

**वंदे मातरम संपूर्ण गायले पाहिजे**

वंदे मातरमच्या मुद्द्यावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, एखादी तांत्रिक चूक झाली असेल तर ती दुरुस्त केली पाहिजे. मात्र, भाजपच्या सभा, विधिमंडळ तसेच राज्य सरकारच्या कार्यक्रमांमध्ये पूर्णपणे वंदे मातरम गायले जात आहे. देशाच्या सरकारने केलेल्या नियमांचे पालन झाले पाहिजे आणि वंदे मातरम पूर्ण गायले गेले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. वंदे मातरम हे देशाच्या संस्कार, संस्कृती आणि परंपरेचे प्रतीक असून, भारतमातेला सर्वोच्च स्थान आणि तिरंग्याला सर्वोच्च मान देण्याची भावना पुढच्या पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे, असेही ते म्हणाले.

**नेत्याला पद मिळाल्याने कार्यकर्त्यांचा आनंद स्वाभाविक**

नाशिकच्या पालकमंत्रिपदाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री आणि पक्षातील पदांबाबत सुरू असलेल्या चर्चेवर बावनकुळे म्हणाले की, एखाद्या नेत्याला पद मिळाल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि आनंद असतो. आपला नेता मोठा झाला किंवा त्याला पद मिळाले याचा कार्यकर्त्यांना आनंद होतो. त्यातून विरोधकांनी एवढी धास्ती घेण्याची गरज नाही, असे त्यांनी सांगितले.

**शाळेत तपासणी करताना संबंधित यंत्रणेला विश्वासात घ्या**

शाळांमध्ये तपासणी करण्याच्या मुद्द्यावर अभिजित दिपके यांना आवाहन करताना बावनकुळे म्हणाले की, शासकीय व्यवस्थेमध्ये शाळा तपासणी करताना काही त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्त केल्या पाहिजेत. मात्र, संपूर्ण शाळा व्यवस्था खराब आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य नाही.

शाळेत जाताना पोलिस प्रशासन, शिक्षण विभाग आणि शाळा व्यवस्थापनाला विश्वासात घेणे आवश्यक आहे. सरकारी धाड टाकल्यासारखी तपासणी करणे योग्य नाही. त्यामुळे संबंधित यंत्रणेला आधी माहिती देऊनच पुढील कार्यवाही करावी, अशी विनंती त्यांनी केली.

**अंगणवाडी सेविकेवरील कारवाईची माहिती घेणार**

अंगणवाडी सेविकेच्या निलंबनाबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने तिने योग्य पद्धतीने सरकारसमोर विषय मांडला असेल तर तिच्यावर कारवाई करणे योग्य नाही. मात्र, नेमक्या कोणत्या कारणामुळे कारवाई झाली हे पाहावे लागेल. पुरवठ्यात काही गैरप्रकार किंवा इतर नियमभंग झाला असेल तर त्याची माहिती घेऊन आपणही लक्ष घालू, असे त्यांनी सांगितले.

**साखरेच्या दरवाढीवर केंद्राशी चर्चा**

साखरेच्या दरवाढीबाबत केंद्र आणि राज्य सरकारच्या पातळीवर चर्चा होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाकडे लक्ष दिले आहे. साखरेचा साठा, पुरवठ्यातील तफावत किंवा इतर कारणांमुळे दरवाढ झाली असण्याची शक्यता आहे. केंद्राशी चर्चा करून यावर मार्ग काढला जाईल, असे बावनकुळे म्हणाले. साखरेऐवजी थेट इथेनॉल निर्मितीकडे काही कारखाने वळत असल्याने साखरेचे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या बाबीकडेही लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

**भाजपमध्ये पंतप्रधान होण्याची कोणालाही घाई नाही**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना उपपंतप्रधान करण्याच्या चर्चेवर आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्यावर बावनकुळे यांनी पक्षांतर्गत व्यवस्थेचा दाखला दिला. भाजप हा कौटुंबिक व्यवस्थेतून चालणारा पक्ष नसून संघटनात्मक व्यवस्थेतून निर्णय घेतले जातात. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली सर्वजण काम करत असून, पंतप्रधान होण्याची कोणालाही घाई नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

**SIR बाबत सर्व पक्षांनी जनजागृती करावी**

रक्षप्रक्रियेत ज्या मतदारांची नावे राहिली आहेत, त्यांच्यासाठी सर्व पक्षांच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी काम केले पाहिजे. स्थलांतरित आणि बोगस नावे कमी होतील; मात्र काही टक्के नावे अद्याप राहिली असतील तर त्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. राज्यातील एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी सर्व पक्षांनी पुढाकार घ्यावा, असे बावनकुळे म्हणाले.

**केवळ फोटो काढण्यापेक्षा प्रत्यक्ष काम करण्याची गरज**

रोहित पवार यांनी निवडणूक आयोगाची भेट घेण्याऐवजी आपल्या कार्यकर्त्यांना नावांची पडताळणी करण्यास सांगावे. केवळ फोटो काढण्यापेक्षा प्रत्यक्ष काम करण्याची गरज आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

**समन्वय समितीच्या फॉर्म्युल्यावर मतभेद**

समन्वय समितीच्या निर्णयाबाबत आपण सहमत नसल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकाऱ्यांना निधीवाटपाचा फॉर्म्युला देण्यात आला आहे. संबंधितांना त्यांच्या हिश्श्याचे पैसे मिळणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

**शासकीय व्यवस्थेला विश्वासात घेऊनच तपासणी करा**

शाळा तपासणी किंवा कोणत्याही शासकीय व्यवस्थेची पाहणी करताना संबंधित विभाग आणि प्रशासनाला विश्वासात घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्याचा गैरफायदा इतरांकडून घेतला जाऊ शकतो. त्यामुळे संबंधितांनी शासकीय यंत्रणेला माहिती देऊनच पुढील कार्यवाही करावी,

## रोहयोची थकीत मजुरी तातडीने द्या!

### ३-४ महिन्यांची मजुरी रखडली, रोजगार सेवकांचे मानधन अन् पुरवठादारांची २-३ वर्षांपासून बिले थकीत

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

रोहयोतील मजुरांची थकीत मजुरी, रोजगार सेवकांचे मानधन, कर्मचाऱ्यांचे पगार आणि पुरवठादारांची प्रलंबित बिले तातडीने अदा करण्यात यावीत, या मागणीसाठी उमरेड विधानसभा शिवसेना (शिंदे गट) संघटिका प्रमुख इंजि. सपना मेश्राम (रामटेके) आणि सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र मेश्राम यांनी विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियानाच्या आयुक्त अनिता मेश्राम यांना निवेदन दिले.




रोहयोतील अनेक मजुरांची तब्बल ३ ते ४ महिन्यांची मजुरी प्रलंबित असून, अधिकारी-कर्मचारी आणि रोजगार सेवकांचे पगार व मानधनही वेळेवर मिळत नसल्याने त्यांच्यासमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. मनरेगा तसेच मातोश्री पांधण रस्ते योजनेअंतर्गत साहित्य पुरवूनही अनेक पुरवठादारांची २ ते ३ वर्षांपासून बिले रखडली असल्याचा मुद्दाही निवेदनात मांडण्यात आला.

व्ही. जी. रामजी योजना सुरू करण्यापूर्वी मनरेगा व इतर योजनांतील सर्व थकीत मजुरी, पगार, मानधन आणि पुरवठादारांची बिले पूर्णपणे अदा करण्यात यावीत, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. रोजगार सेवकांना नियमित मानधनासह दरमहा १५ हजार रुपये व ३ हजार रुपये पेट्रोल खर्च देण्याची मागणीही करण्यात आली.

कष्टकऱ्यांच्या घामाचा मोबदला रोखू नका. शासनाच्या योजनांची कामे प्रामाणिकपणे पूर्ण करणाऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे वेळेत मिळालेच पाहिजेत, अशी भूमिका सपनाताई मेश्राम व राजेंद्र मेश्राम यांनी मांडली.

सदर निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच संबंधित मंत्र्यांनाही पाठविण्यात आले आहे. या वेळी शिवदास भोयर, शामल अनकर, राहुल सहारे, शुद्धोधन गजभिये, विनोद डहाके, शैलेश शेंडे, सुभाष मेश्राम, संजय रामटेके, भारती रामटेके, रुपेश भरत, मंगला सूर्यवंशी, पांडुरंग पंचबुडे, आशिफ शेख, ज्ञानेश्वर उके आदी उपस्थित होते.

## घरफोडीचे २ गुन्हे उघड, ७७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त, पारशिवनी पोलिसांची कामगिरी

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. अनिल म्हस्के आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रमेश बरकते यांच्या मार्गदर्शनाखाली पारशिवनी पोलिसांनी घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आणून ७७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस स्टेशन पारशिवनी येथे दाखल असलेल्या अज्ञात घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास गुन्हे शोध पथक करीत होते. या दरम्यान पथकातील अधिकारी व अंमलदारांनी गुप्त बातमीदाराच्या माहिती आणि तांत्रिक पुरावे यांच्या आधारे एका विधी संघर्षग्रस्त बालकाला निष्पन्न केले. २१ ऑगस्ट २०२६ रोजी सदर बालकाला ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता, त्याने पारशिवनी पोलीस स्टेशन हद्दीत दोन ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून पोलिसांनी पंचांसमक्ष पुढील मुद्देमाल जप्त केला आहे. यात एक लॅपटॉप - १५,००० रु., विना क्रमांकाची एक अँक्टिव्हा मोपेड - ५०,००० रु., एक मोबाईल - ५,००० रु., पिवळ्या धातूचे एक पदक ( अंदाजे ०.५ ग्रॅम) - ७,५०० रु. असा एकूण ७७,५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ताब्यात घेतलेल्या विधी संघर्षग्रस्त बालकाच्या नातेवाईकांना माहिती देऊन त्याला पुढील कार्यवाहीसाठी बाल न्याय मंडळ, नागपूर येथे रवाना करण्यात आले आहे. पुढील तपास पारशिवनीचे सहाय्यक पोलीस निरिक्षक करीत आहे.

## महापौरांच्या गीत गायनाने श्रावण उत्सवाला वेगळीच ऊर्जा

### महापौर श्रावण उत्सवाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने महिलांच्या दैनंदिन जबाबदाऱ्या आणि व्यस्त जीवनशैलीतून त्यांना आनंदाचे काही क्षण अनुभवता यावेत, आप्तमैत्रिणींसोबत मनमोकळेपणाने वेळ घालवता यावा आणि त्यांच्यातील आत्मविश्वास व सक्षमीकरणाला प्रोत्साहन मिळावे, या हेतूने 'महापौर श्रावण उत्सव सोहळा' मनपातर्फे आयोजित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने नंदनवन येथील त्रिशताब्दी उद्यानात उत्साहपूर्ण वातावरणात शुक्रवार (ता.२१) रोजी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रावणाच्या निमित्ताने आयोजित या आनंदोत्सवात महिलांनी विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, मनपाच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने महिलांसाठी प्रथमच अशा स्वरूपाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात नागपूर महानगरपालिकेच्या मा. महापौर निता ठाकरे, हनुमान नगर झोन सभापती ज्योती देवघरे, नेहरू नगर झोन सभापती सीमा ढोमणे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, जलप्रदाय विशेष समिती सभापती दिव्या धुरडे, परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती रुपाली ठाकूर, हनुमान नगर झोन सभापती ज्योती देवघरे, नगरसेविका श्रीमती मंगला मस्के, माजी नगरसेविका स्नेहल बिहारे, मनीषा नगरधनकर, रजनी वानखेडे, माजी नगरसेविका विशाखा जोशी, माजी नगरसेविका वंदना भगत, माजी नगरसेविका स्वाती आखतकार, प्रगती पाटील, सविता मते, क्रीडा विभागाच्या उज्वला चरडे, कार्यकारी अभियंता सविता गणोरकर यांच्यासह मनपाचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

जलप्रदाय विशेष समिती सभापती दिव्या धुरडे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून




कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना महापौर यांनी सांगितले की, आपल्या दैनंदिन कामात व्यस्त असलेल्या शहरातील सर्व मैत्रिणींसाठी(महिलांसाठी) महानगरपालिकेच्या सर्व महिला नगरसेविका आणि कर्मचारी यांच्या प्रयत्नांतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे नाव लिहितांना जरी महापौर असा उल्लेख असा तरी परिश्रम सर्व महिला नगरसेविकांचे आहे. यावेळी बोलतांना रोजच्या धगधगीतून वेळ काढून आपण सर्व जणी कार्यक्रमाला तयार होऊन नटून-सजून आल्या म्हणून सर्व उपस्थित महिलांचे कौतुक केले. विशेष म्हणजे यावेळी महापौरांनी गीत गायले. ज्यामुळे कार्यक्रमाला वेगळाच आपलेपणा आणि ऊर्जा प्राप्त झाली.

यावेळी महिलांनी विविध कार्यक्रमात सहभाग घेऊन आनंद लुटला. यावेळी टास्क, शृंगार, डान्स , गाणे , मजेशीर खेळ घेण्यात आले. नागपूर महानगरपालिकेद्वारा सहभागी महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या. विविध मनोरंजनात्मक उपक्रमांनी कार्यक्रमात रंगत आणली. यावेळी सर्व विजेत्या महिलांना "पैठणी साडी व डिनर सेट" देऊन गौरविण्यात आले. संजना नवघरे, प्रीती, संध्या, मंजुषा सदावर्ते या विविध खेळाच्या विजेत्या ठरल्या.

थोडक्यात

## ऑल इंडिया उलमा बोर्डाच्या मुतवल्ली विंगतर्फे २२ ऑगस्टला संवाद कार्यक्रम, 'मेरा संविधान, मेरी शान' अभियानाचा शुभारंभ



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अल्पसंख्याक समाजाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी ऑल इंडिया उलमा बोर्डाच्या मुतवल्ली विंगतर्फे २२ ऑगस्ट रोजी नागपुरात संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दुपारी २ ते ४ यावेळेत शिजान मॅशन, हल्दीरामच्या बाजूला, जाफरनगर येथे होणार आहे. या कार्यक्रमात वक्फ संपत्तीचे संरक्षण व पारदर्शकता, नशामुक्ती, शिक्षण, रोजगार, महिला सक्षमीकरण, सामाजिक एकता तसेच युवक आणि मुलांमध्ये वाढणाऱ्या गुन्हेगारीसारख्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. विशेषतः १४ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांना गुन्हेगारीपासून दूर ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर तसेच अल्पसंख्याक समाजात मराठी भाषेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या मुद्द्यावरही विचार विनिमय केला जाणार आहे. 'मेरा संविधान, मेरी शान' अभियानाचा शुभारंभ या कार्यक्रमा दरम्यान 'मेरा संविधान, मेरी शान' या अभियानाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. हे अभियान संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्याचे नियोजन असून, संविधानाबाबत जनजागृती, सामाजिक जबाबदारीची भावना आणि राष्ट्रीय एकात्मता अधिक मजबूत करणे हा त्यामागील उद्देश आहे.

या विविध मुद्द्यांसंदर्भात शासनासमोर मागण्या व भूमिका मांडण्यासाठी २३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता केंद्रीयमंत्री नितीनजी गडकरी यांची भेट घेण्याचे प्रस्तावित आहे. कार्यक्रमाला ऑल इंडिया उलमा बोर्डाचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना नौशाद सिद्दीकी, राष्ट्रीय महासचिव अल्लामा बुनाई हस्नी आणि मुतवल्ली विंगचे राष्ट्रीय अध्यक्ष शेख फैसल मुजावर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. आयोजक हाजी सोहेल पटेल अशरफी आणि फातिमा पठाण यांनी नागपूर व विदर्भातील उलमा, दानिशवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच जबाबदार नागरिकांनी या संवाद कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

## पुरातन हेमांडपंथी शिव मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर विद्युत रोषणाईचे लोकार्पण



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर शहरातील पुरातन व ऐतिहासिक हेमांडपंथी शिव मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईचे लोकार्पण भाजप जिल्हा उपाध्यक्ष रामरावजी मोवाडे व सावनेर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा संजना मंदार मंगळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. पुरातन हेमांडपंथी शिव मंदिर हे सावनेर शहराच्या धार्मिक व ऐतिहासिक वैभवाचे प्रतीक असून, मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर करण्यात आलेल्या विद्युत रोषणाईमुळे मंदिर परिसराच्या सौंदर्यात मोठी भर पडली आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळी मंदिराचे प्रवेशद्वार आकर्षक दिसणार असून, भाविक व नागरिकांसाठी हे एक सुंदर धार्मिक व पर्यटनस्थळ म्हणून अधिक उठून दिसणार आहे.

यावेळी प्रभाग क्र. ९ चे नगरसेवक तथा गटनेते रविंद्र ठाकूर, नगरसेविका मनीषा मनीष खंगारे, अर्पना बागडे, योगिता घोरमारे, देवस्थानचे अध्यक्ष लवकेश सेवके, कोषाध्यक्ष किशोर गुऱ्हारीकर, तसेच मंदार मंगळे, सदानंद मोवाडे, रतन खंगारे, राजू पटेल,विजय ठाकूर, विपीन दुबे,पवन मंगरूले, जगदिश खंगारे, मनीष खंगारे यांच्यासह देवस्थानचे पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक उपस्थित होते. पुरातन हेमांडपंथी शिव मंदिराच्या जतन, संवर्धन व सौंदर्यीकरणासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमुळे सावनेरच्या धार्मिक आणि ऐतिहासिक वारशाला नवी ओळख मिळत आहे.

## राजयोगिनी दादी प्रकाशमणि जी यांच्या १९ व्या पुण्यस्मृतीनिमित्त विश्व बंधुत्व रक्तदान महाअभियान

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

राजयोगिनी दादी प्रकाशमणि जी यांच्या १९ व्या पुण्यस्मृतीनिमित्त विश्व बंधुत्व रक्तदान महाअभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश समाजामध्ये मानवतेची भावना,



विश्वबंधुत्व आणि रक्तदानाचे महत्त्व जागृत करणे हा आहे. 'रक्तदान हेच जीवनदान' या भावनेतून अधिकाधिक नागरिकांनी या सेवाकार्यात सहभागी व्हावे. ब्रह्माकुमारीज सावनेर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुरेखा दीदी यांनी सर्व तरुण भाऊ-बहिणींना तसेच समाजातील नागरिकांना या रक्तदान महाअभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन केले असुन या मानवतावादी उपक्रमात सहभागी होऊन आपले रक्त एखाद्या गरजू व्यक्तीचे जीवन वाचवू शकते.त्यामुळे सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे आणि मानवसेवेत आपले योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रक्तदान करण्यासाठी https://bksocialwing.org/donor-registration/?camp_id=BDC2026-0602 या ऑनलाइन लिंक वर आपले रजिस्ट्रेशन करण्याची विनंती केली आहे. ब्रह्माकुमारीज सावनेर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुरेखा दीदी यांनी सर्व तरुण भाऊ-बहिणींना तसेच समाजातील नागरिकांना या रक्तदान महाअभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे. दिनांक २३ ऑगस्ट २०२६ ला सकाळी १० ते सायंकाळी ५ या कालावधीत ब्रह्माकुमारीज, महाजन लेआउट, छिंदवाडा रोड, वॉर्ड क्र. ८, सावनेर.येथे रक्त संकलन केले जाणार आहे.अधिक माहितीसाठी मोबाइल नंबरः ८४१२९२०६६३ वर संपर्क साधावा अशी विनंती आयोजकांनी केली आहे

# 'वॉक फॉर वॉटर' उपक्रमातून जलसाक्षरतेचा संदेश




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जलसंधारण व पाणी प्रश्नाप्रती अधिकाधिक जनजागृती व्हावी या उद्देशाने माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित 'वॉक फॉर वॉटर' या उपक्रमाला युवकांनी भरभरून प्रतिसाद दिला. मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने आयोजित वॉकेथॉनचा शुभारंभ आमदार चरणसिंह ठाकूर यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ केला.

भविष्यातील जल संकटांवर मात करण्यासाठी जलसाक्षरता ही काळाची गरज असून -पाणी अडवा, पाणी जिरवा, पाणी वाचवा व देश समृद्ध करा' असा संदेश आमदार चरणसिंह ठाकूर यांनी उपस्थितांना दिला. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, अधीक्षक अभियंता हनुमंत खटके, अधीक्षक अभियंता विपीन साखरकर, उपविभागीय जलसंधारण अधिकारी वैभव सोनोने, राजेंद्र शाम, सावन जयस्वाल, श्रीकांत ढोके, वरिष्ठ भूवैज्ञानिक वर्षा माने, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रशेखर चिखले, जलअभ्यासक प्रवीण महाजन आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यात सुरू असलेली जलसंधारनेच्या चळवळीत अधिकाधिक लोकसभागासाठी हा उपक्रम प्रत्येकाच्या मनात विश्वास निर्माण करणारा ठरला.

### नागपुरात 'महा वॉकेथॉन'ला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

शाश्वत विकासासाठी मृद व जलसंधारणाचे महत्त्व जनमानसात पटवून देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जलस्त्रोतांचे संवर्धन व पाण्याचा जबाबदारीने वापर करण्याचा संदेश युवकांनी या 'वॉक फॉर वॉटर' या उपक्रमातून दिला. सकाळी सहा वाजता सिव्हिललाईन्स येथील लेडीज क्लब येथून ह्यमहा वॉकेथॉन - ह्यवॉक फॉर वॉटरह्ण रॅलीची सुरवात झाली. रॅलीच्या यशस्वितेसाठी अधीक्षक अभियंता हनुमंत खटके, कार्यकारी अभियंता विपीन साखरकर, सावन जयस्वाल, श्रीकांत ढोके, वैभव सोनोने यांनी परिश्रम घेतले.

रॅलीत एनसीसी, एनएसएस, विविध युवा संघटना, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी हातात जलसंरक्षणाचे फलक घेऊन आपला सहभाग नोंदवला.

## गोतमारे गुरुकुलचा मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी बंगल्यावर गौरव

### विद्यार्थ्यांच्या यशाला मुख्यमंत्र्यांची शाबासकी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या गोतमारे सरांच्या मार्गदर्शनाखाली गोतमारे गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या उल्लेखनीय यशाचा नागपुरात गौरव करण्यात आला.

गोतमारे गुरुकुलला प्राईड ऑफ भारत अवॉर्ड, तसेच विद्यार्थ्यांना 'शास्त्र व शस्त्र शिष्यरत्न' असे दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील रामगिरी बंगल्यावर गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांचे कौशल्य, शिस्त, संस्कार आणि समाजासाठी सुरू असलेले कार्य यांचे कौतुक करण्यात आले. तसेच सहसचिव आशा पठाण यांच्या मंत्रिमंडळ कार्यालयातही गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून शुभेच्छा देण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोतमारे गुरुकुलच्या कार्याचे कौतुक करत 'तुम्ही लोक छान काम करत आहात. काही अडचण आल्यास नक्की सांगा,' असे आश्वासन देत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**विद्यार्थ्यांच्या यशामागे गोतमारे सरांची अथक मेहनत**

या यशामागे केवळ पुरस्कार नाही, तर गोतमारे सरांनी मुलांसाठी घेतलेली सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त, संस्कार आणि योग्य मार्गदर्शनाची मोठी भूमिका आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी ते स्वतःचा वेळ, ऊर्जा आणि अनुभव देत सातत्याने कार्यरत आहेत.

मुलांना फक्त शिकवायचे नाही, तर त्यांना घडवायचे, या भावनेतून गोतमारे सरांचे सुरू असलेले कार्य अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देत आहे. रामगिरी बंगल्यावर उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांचे कौशल्य आणि राष्ट्रीय पुरस्कारांची दखल घेत गुरुकुलचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या गौरवाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहसचिव आशा पठाण तसेच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे गोतमारे गुरुकुलच्या वतीने मनःपूर्वक आभार. गोतमारे सरांची मेहनत, विद्यार्थ्यांचे यश आणि गुरुकुलचा राष्ट्रीय सन्मान हीच खरी अभिमानाची बाब आहे.

## पत्रकार संघाने केला ठाणेदार संदिप बुवा यांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

खापरखेडा शहर पोलीस ठाण्याची धुरा स्वीकारल्यानंतर नवनियुक्त पोलीस निरीक्षक तथा ठाणेदार संदीप बुवा यांची अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ संलग्न खापरखेडा पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्ष भेट स्वरूपात देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. खापरखेडा शहर व परिसरातील वाढते नागरीकरण, वाहतूक समस्या, गुन्हेगारी प्रतिबंध, सामाजिक सलोखा आणि नागरिकांच्या सुरक्षेसंदर्भातील विविध मुद्द्यांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. पोलीस प्रशासन आणि प्रसारमाध्यमे यांच्यातील समन्वय अधिक बळकट झाल्यास समाजहिताचे प्रश्न प्रभावीपणे हाताळता येतील, असा सूर बैठकीत उमटला. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त अंकुश खेडकर यांनी पत्रकारांशी संवाद साधत लोकशाही व्यवस्थेत प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. वस्तुनिष्ठ पत्रकारिता आणि जबाबदार वृत्तांकनामुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले. तसेच नागरिकांच्या हिताशी संबंधित विषय प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी पत्रकार आणि पोलीस यांच्यातील संवाद सातत्याने सुरू राहणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सत्काराला उत्तर देताना ठाणेदार संदीप बुवा यांनी खापरखेडा परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. नागरिकांचा पोलीस यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी पारदर्शक व संवेदनशील पद्धतीने काम करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. समाजातील विविध घटक, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि पत्रकार यांच्या सहकार्याने गुन्हेगारीविरोधी मोहिम अधिक प्रभावी करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने पोलीस प्रशासन आणि पत्रकारिता क्षेत्रातील परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. उपस्थितांनी नव्या ठाणेदारांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत खापरखेडा परिसर शांत, सुरक्षित आणि गुन्हेमुक्त ठेवण्यासाठी संयुक्त प्रयत्नांची अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी विदर्भ संघटक अरुण महाजन, नागपूर जिल्हाध्यक्ष दिलीप गजभिये, जिल्हा मानद सदस्य ओमप्रकाश साद, जिल्हा कायदेविषयक सल्लागार प्रदीप खांबलकर, खापरखेडा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुधीर फेंडर, सचिव जयंत चौव्हाण, कार्याध्यक्ष वैभव काकडे, उपाध्यक्ष आकाश राऊत, कोषाध्यक्ष सुशील सहारे, तसेच शैलेश ढोरे, किशोर बक्सरिया, राजू ढोरे यांच्यासह परिसरातील अनेक पत्रकार उपस्थित होते.



## लोककलेच्या सादरीकरणातून शाहीर टेंभुर्णे गुरुजींना अभिवादन

### गुरु-शिष्य योजनेअंतर्गत रामटेक येथे गुरुवंदन सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक/नागपूर**

लोककलेच्या समृद्ध परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासोबतच ज्येष्ठ कलावंत शाहीर टेंभुर्णे गुरुजी यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी रामटेक येथे गुरुवंदन सोहळा आणि लुप्त होत चाललेल्या लोककलांचे रंगारंग सादरीकरण करण्यात आले.



भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय, नवी दिल्ली आणि जय भीम डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, रामटेक, शाहीर टेंभुर्णे गुरुजी सार्वजनिक वाचनालय, रामटेक, विश्रांती सूर कला प्रतिष्ठान, रामटेक तसेच द लॉर्ड अशोका बॅकवर्ड मल्टिपर्पज सोसायटी, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने गुरु-शिष्य योजनेअंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

ज्येष्ठ कलावंत गंगाधरजी तराळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून वेदांत दलाल, आनंदराव साठवणे आणि चिंधुजी कडवे उपस्थित होते. यानंतर जय भीम डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीतर्फे गुरुवंदन सोहळा व दुर्मिळ होत चाललेल्या लोककलेचे सादरीकरण करण्यात आले. शाहीर टेंभुर्णे गुरुजी सार्वजनिक वाचनालयातर्फे वारसा लोककलेचा, विश्रांती सूर कला प्रतिष्ठानतर्फे रंगला फड लोककलेचा, तर द लॉर्ड अशोका बॅकवर्ड मल्टिपर्पज सोसायटीतर्फे पारंपरिक लोककला गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

मोठ्या संख्येने नागरिक कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सहभागी सर्व कलावंतांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवर, कलाकार आणि रसिक प्रेक्षकांचे आभार मानण्यात आले.

# ८०-९०च्या दशकातील गीतांनी रंगला 'हिट्स ऑफ ८० आणि ९०'चा सुरेल कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पर्सोनिक इव्हेंट्सतर्फे नागपूरकर संगीतप्रेमींसाठी 'हिट्स ऑफ ८० आणि ९०' या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक हॉलमध्ये करण्यात आले. ८० आणि ९०च्या दशकातील लोकप्रिय हिंदी गीतांनी कार्यक्रमाला जुन्या आठवणींचा आणि सुरेल संगीताचा रंग दिला.




कार्यक्रमाची सुरुवात समीर पंडित यांनी 'तू इस तरह से मेरी' या गीताने केली. त्यानंतर दत्तात्रय वझरकर यांनी 'बस एक सनम चाहिए', मनश्री जोशी यांनी 'प्यार करने वाले', विजया वाईदेशकर यांनी 'कितने भी करले तू सितम', डॉ. कल्याणी कापसे यांनी 'प्यार हुआ चुपके से', समीक्षा चरडे यांनी 'जवानी जानेमन' आणि 'सात समंदर पार', डॉ. अमृता पारोलकर यांनी 'जिया जले', शशिकांत वाघमारे यांनी 'जब से तेरे नैना', पद्मशेखर पनके यांनी 'मेरा चांद मुझे', सुनील माहुरकर यांनी 'ये जिंदगी गले लगा ले', तर विवेक प्रतापे यांनी 'छु कर मेरे मन को' ही गाणी सादर केली.

कार्यक्रमातील स्टार सिंगर निकेता जोशी यांनी 'ऐसा समा ना होता ' यांसारखी लोकप्रिय गाणी सादर करून रसिकांची दाद मिळवली. यानंतर 'हर किसी को नही', 'परदेसी परदेसी', 'जाने जिगर जानेमन', 'आके तेरी बाहो मे', 'आज रपट जाये तो', 'साथिया तुने क्या किया', 'टिप टिप बरसा पानी', 'मधहोश दिल की धडकन', 'जब हम जवा होंगे', 'तेरे जैसा यार कहा', 'वादा रहा सनम', 'कभी भुला कभी याद किया', 'हो गया है तुझको तो प्यार', 'तुम पास आये' आणि 'क्या यही प्यार है' यांसारखी द्वंद्वगीते सादर करण्यात आली.

या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना, निवेदन आणि गायन समीर पंडित यांनी केले. वाद्यवृंदावर परिमल जोशी, ऋग्वेद पांडे, पंकज यादव, महिंद्र वाटुळकर आणि सूरज मोगरे या कलाकारांनी सुरेल साथसंगत केली. जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीतील गाजलेल्या गीतांनी सायंटिफिक हॉलमधील वातावरण संगीतमय करत रसिकांना ८०-९०च्या दशकातील आठवणींमध्ये रमविले.

थोडक्यात

## श्री गुरुदेव क्रांतीज्योत यात्रेचे रामटेकात स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची गुरुकुंज आश्रम मोझरी येथून दिनांक ९ ऑगस्टला निघालेली क्रांतीज्योत रामटेक तालुक्यात आगमन झाले. अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ शाखा रामटेकच्यावतीने गांधी चौक रामटेक येथे क्रांतीज्योत यात्रेचे भव्य दिव्य स्वागत करण्यात आले. नगरधन येथील जिल्हा परिषद शाळा वाचनालय येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अधिष्ठानाचे पूजन व महाराजांच्या आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. महाराजांच्या पालखी पूजनाचा सोहळा आनंदात पार पडला. कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक अमृता कडूकर यांनी केले. प्रास्ताविक दीपक मोहोड यांनी केले. अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ जिल्हासर्वाधिकारी निळकंठ कळंबे यांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्वातंत्र्य लढ्यात योगदान यावर मार्गदर्शन केले. उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील यांनी क्रांतीज्योती यात्रेचे महत्व विशद केले.

अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ नगरधन अध्यक्ष शंभूजी नंदनवार यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमात माजी सभापती पंचायत समिती रामटेक रेखाताई कडूकर, शंकर होलगिरे, नरेंद्र बंधाटे, सरपंच माया दमाहे , उपसरपंच राम धोपटे, नागपूर जिल्हा महिला सेवाधिकारी कांचनमाला माकडे,नागपूर जिल्हा भजन प्रमुख मोरेश्वर माकडे, राष्ट्रीय प्रचार विभाग सचिव डॉक्टर ज्ञानेश्वर मुडे, नागपूर जिल्हा सचिव भैयालाल माकडे, ग्रामगीताचार्य रामभाऊजी ढाकूलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. भूषण कडूकर, प्रशांत कांबडी, अरुण पुंडलिके, सुशील क्षीरसागर, केशव राऊत, मधुकर कुर्वे, राजू देशमुख, नरेंद्र नेरकर श्रीधर पुंड,नानाभाऊ उराडे,बबीता कोठेकर,छाया वंजारी,पारस माकडे, चैतन कडुकर, सारिका कांबळी, शुभम राऊत,राजश्री कांबळी,ओम कडूकर, यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम केले. कार्यक्रमाचे समापन नारायण टेकडी रामटेक येथे, सामुदायिक ध्यान, सामुदायिक प्रार्थनेने व जयघोषाने करण्यात आले.

## 'काव्यक्रांती एकतेची' राज्यस्तरीय कविसंमेलन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

'क्रांती दिन' आणि महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून करुणासागर बहुउद्देशीय संस्थेतर्फे नटराज सभागृह, हिंदी मोरभवन येथे 'काव्यक्रांती एकतेची २०२६' या राज्यस्तरीय कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास ज्येष्ठ आंबेडकरी कवी इ. मो. नारनवरे आणि माजी प्रशासकीय अधिकारी डॉ. नीलकांत कुलसंगे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. करुणासागर बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रा. हृदय चक्रधर यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका मांडली. या काव्यसंमेलनात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय, संविधान जागृती, महिला सबलीकरण, स्त्रीभ्रूणहत्या, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंचा आदर्श, त्याग मूर्ती रमाईचा संघर्ष तसेच दिल्लीतील जंतर-मंतर येथील मुलांवरील लाठीचार्ज आणि उपवर्गीकरणाच्या मुद्द्यांवर आधारित विविध सामाजिक व आंदोलनात्मक कवितांचे सादरीकरण करण्यात आले.

कवी इ. मो. नारनवरे, डॉ. नीलकांत कुलसंगे, शालिक जिल्हेकर, सरिता सातारडे, हेमलता ढवळे, प्रा. हृदय चक्रधर, मनोहर गजभिये, प्रकाश दुलेवाले, सिद्धार्थ मेश्राम, डॉ. भूषण भस्मे, लैलेन्द्र अंबुलकर, चित्तरंजन चौरे, डॉ. संजीवनी लांजेवार, दुर्गा मेश्राम, डॉ. मनिष वानखेडे, इम्रान शेख, संजय सायरे, लीलाधर गायकवाड, प्रभु फुलझेले, रजनी फुलझेले, रंजना भैसारे, प्रतिभा सहारे, सुषमा कळमकर, सुभाष मानवटकर, रोशनी गणवीर, वामन नील, संगीता बनकर, नागेश वाहुरवाघ आणि दीपक पाचभाई इत्यादी मान्यवर कवींनी आपल्या बहारदार रचना सादर करून रसिकांची दाद मिळवली. या प्रसंगी चळवळीतील कार्यकर्त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. मच्छिंद्र चोरमारे, रवी सहारे, भीमराव गणवीर, संजय सातारडे, दिलीप पवार यांच्यासह मोठ्या संख्येने रसिक श्रोते उपस्थित होते. संचालन प्रकाश दुलेवाले यांनी केले.

## त्रिवेणी संगमाची राष्ट्रीय पातळीवर दखल, डॉ .विलास साठवणे यांना 'राष्ट्रीय प्रेरणा गौरव सन्मान २०२६' जाहीर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वैद्यकीय सेवा, संगीत आणि कला क्षेत्रातील अतुलनीय व उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. विलास महादेवराव साठवणे यांना यंदाचा प्रतिष्ठित 'राष्ट्रीय प्रेरणा गौरव सन्मान २०२६' जाहीर झाला आहे. एकाच वेळी आरोग्यसेवा, गायन आणि कला क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आल्याने सर्वस्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. एक समर्पित वैद्यकीय अधिकारी आणि डॉक्टर म्हणून समाजाला गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पुरवताना त्यांनी नेहमीच करुणा, वचनबद्धता आणि व्यावसायिकता जपली आहे. आरोग्यसेवेच्या व्यस्त दिनक्रमातही त्यांनी संगीत, गायन आणि कला क्षेत्रातील आपली आवड जोपासत सामाजिक प्रेरणेचे एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. वैद्यकीय सेवेसोबतच त्यांनी कला व संगीत क्षेत्रातही आपली खास ओळख निर्माण केली आहे. "हा पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी क्षण आहे. आरोग्यसेवा, कला आणि संगीत क्षेत्रात योगदान देण्याची संधी मिळाली हे माझे सौभाग्य समजतो. ही सेवा आणि कला साधना अशीच अखंडपणे सुरू ठेवण्याचा माझा संकल्प आहे, असे डॉ. विलास साठवणे यांनी सांगितले.



# राष्ट्रवादीचे सरचिटणीस प्रभाकर दोनोडे यांच्यामुळे सालेकसाचे कार्यकर्ता नाराज

### पक्षात राहून विरोधकांना कामे विकल्याचा गंभीर आरोप, पत्रकार परिषदेत पदाधिकाऱ्यांची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रभाकर दोनोडे यांच्याविरोधात पक्षांतर्गत नाराजी पुन्हा एकदा उफाळून आली आहे. धनवडे यांची पक्षातून हकालपट्टी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत केली.

दोनोडे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांचे समर्थक तसेच खासदार राजेंद्र जैन यांचे



निकटवर्तीय असल्याचे सांगितले जाते. मात्र, पक्षात महत्त्वाचे पद असतानाही त्यांनी पक्षाच्या भूमिकेविरोधात काम केल्याचा आरोप पत्रकार परिषदेत करण्यात आला.

पक्षात राहून इतर पक्षातील व्यक्तींना तसेच काही जवळच्या नातेवाईकांना आर्थिक व्यवहार करून कामे मिळवून दिल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला. कामे मिळवून देताना कथितरीत्या मोठ्या टक्केवारीचे व्यवहार झाल्याचा दावा पदाधिकाऱ्यांनी केला. या आरोपांमुळे गोंदिया जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत वाद पुन्हा चर्चेत आला आहे.

राष्ट्रवादीचे कार्यकर्ते सुरेश अग्रवाल, कमलेश लिल्हारे, ओमप्रकाश उपराडे, कैलास धामडे, ओमप्रकाश पारधी संतोष लिल्हारे, भैयालाल नागपुरे, आदित्य अग्रवाल यांच्यासह अन्य पदाधिका?्यांनी प्रभाकर दोनोडे यांच्याविरोधात पक्षाचे नेते राजेंद्र जैन यांच्याकडे लेखी तक्रार केल्याचे सांगितले. तसेच प्रफुल्ल पटेल यांच्याकडेही यासंदर्भात पत्रव्यवहार करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

**शैक्षणिक संस्थांच्या कारभाराचीही चौकशी करण्याची मागणी**

दरम्यान आमगाव तालुक्यातील वडद येथे प्रभाकर दोनोडे यांची राजीव गांधी महाविद्यालयाशी संबंध असल्याची तसेच एका शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे असल्याची माहिती असल्याचा दावा पत्रकार परिषदेत करण्यात आला. संबंधित शैक्षणिक संस्थांच्या कारभाराचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

शैक्षणिक संस्थांकडे पुरेसे लक्ष न देता राजकारण आणि ठेकेदारीच्या कामांमध्ये अधिक वेळ दिला जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोपही करण्यात आला. या सर्व आरोपांची पक्षाने तसेच संबंधित प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून सत्यता समोर आणावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. प्रभाकर दोनोडे यांच्यावर करण्यात आलेले आरोप हे पत्रकार परिषदेत मांडण्यात आले असून, त्यांची स्वतंत्रपणे पडताळणी झालेली नाही. प्रभाकर दोनोडे यांची या आरोपांवरील बाजू समोर आल्यास तीही प्रसिद्ध होणे अपेक्षित आहे. दोनोडे यांच्याविरोधात करण्यात आलेल्या लेखी तक्रारी आणि पत्रकार परिषदेत मांडलेल्या आरोपांनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षश्रेष्ठी आता कोणती भूमिका घेतात, याकडे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. पक्षाकडून चौकशी करून कारवाई होणार की आरोपांकडे दुर्लक्ष केले जाणार, याबाबत राजकीय चर्चेला उधाण आले.

## समाज कल्याण विभागाचे मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजने अंतर्गत महाडीबीटी प्रणालीवर अर्ज सादर करणेबाबत आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती प्रवगार्तील विद्यार्थ्यांकरीता मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सन २०२६-२७ पासून महाशिष्यवृत्ती या एकात्मिक संगणकीय प्रणालीद्वारे mahadbt 2.0 पोर्टलवर राबविण्यात येत आहे. सदर महाशिष्यवृत्ती प्रणालीमार्फत विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची कार्यपद्धती https:// maha dbt2.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील युजर मॅन्युअलमध्ये सविस्तरपणे देण्यात आलेली आहे. तसेच विविध योजनांचे निकष, पात्रता व शिष्यवृत्ती लाभाचा तपशील सदर संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज तात्काळ वरील संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रसाद कुळकर्णी, प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग नागपूर यांनी केले आहे.

महाशिष्यवृत्ती प्रणालीमध्ये सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, ९ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रिक पूर्व शिक्षण फी परीक्षा फी प्रदाने इ. मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येणार आहे. इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व उत्पन्न प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

तसेच शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये थेट ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात येईल. शिष्यवृत्तीच्या लाभापासून विद्यार्थी वंचित राहु नये याकरीता पालकांनी विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र उपलब्ध करून ठेवावे, विद्यार्थ्यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र अद्यावत करुन घ्यावे, विद्यार्थ्यांचे बँक खाते चालु व अद्यावत ठेवावे, बँक खात्याची केवायसी पूर्ण करुन घ्यावी, आधार क्रमांक बँक खात्याशी आवश्यकतेनूसार लिंक/सीड करून घ्यावा. विद्यार्थ्यांचे नाव, जन्मतारीख व इतर तपशील कागदपत्रांमध्ये अचूक आहेत याची खात्री करावी, शाळेमार्फत मागविण्यात येणारी सर्व आवश्यक कागदपत्रे विहित मुदतीत जमा केल्यास विद्यार्थ्यांना शासनाच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यास सुलभता होईल. अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परीषद यांचेशी संपर्क साधावा.

## पाथरी शहरात कापूस व्यापाऱ्याचे अपहरण

**पाथरी** : शहरातील बीड-परभणी हायवे क्रमांक ६१ वर एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एकता नगर येथील रहिवासी असलेल्या आणि कापसाचा व्यवसाय करणाऱ्या पुरूषोत्तम सोमानी नामक व्यापाऱ्याचे भररस्त्यातून शुक्रवार, दि.२१ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास अवघ्या ३ सेकंदात अपहरण करण्यात आले आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समाज माध्यमांवर व्हायरल होत असून अपहरणाच्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झालेल्या या घटनेत व्यापारी आपल्या दुचाकीवरून जात असताना अचानक एका पांढऱ्या रंगाच्या कारने त्यांना अडवल्याचे दिसत आहे. त्यानंतर गाडीतून काही व्यक्ती खाली उतरुन अवघ्या काही सेकंदांतच व्यापाऱ्याला जबरदस्तीने गाडीत ओढून नेतात आणि गाडी घेऊन तेथून पळ काढतात. ही संपूर्ण घटना इतक्या वेगाने घडली की, आसपासच्या लोकांना काही समजण्याच्या आतच व्यापाऱ्याला पळवून नेण्यात आले.

## श्रीधर अंभोरे हे रेषांचे जीवन जगले : इ. मो. नारनवरे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्रीधर अंभोरे हे जागतिक कीर्तीचे कलावंत होते. रेखाचित्रकार म्हणून त्यांनी दुनियेच्या कॅनव्हासवर आपल्या रेषाचित्रातून अजरामर ठसा उमटविला. रेषांचे जीवन जगणारा हा कलावंत परिवर्तनवादी विचारांचा होता. त्यांच्या कलेतून सामाजिक विषमता, मानवी वेदना आणि परिवर्तनाची आकांक्षा प्रभावीपणे व्यक्त होत होती. त्यामुळे त्यांचे कलाविश्व हे केवळ चित्रकलेपुरते मर्यादित न राहता सामाजिक जाणिवेचे माध्यम बनले, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी इ. मो. नारनवरे यांनी केले. आंबेडकरवादी साहित्य संसद आणि द शेड्युल्ड कास्ट अँड बुद्धिस्ट पेन्शनर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदरांजली सभेत प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. मनोहर नाईक होते. आपल्या अध्यक्षीय चिंतनातून त्यांनी 'कलावंत हा आपल्या कलेतून युगाची स्पंदने टिपत असतो. युगाची स्पंदने टिपून समाजाला नवी दिशा देणारी प्रतिभा हीच खरी युगसाक्षी प्रतिभा असते. श्रीधर अंभोरे यांच्या रेषाचित्रांमध्ये सामाजिक वास्तवाचे भान आणि परिवर्तनाची आंतरिक प्रेरणाही होती," असे मत मांडले. विशेष अतिथी डॉ. प्रकाश राठोड यांनी, "श्रीधर अंभोरे यांचे कलाविश्व हे सामाजिक जाणिवेचे माध्यम ठरले असून आपल्या कलेतून त्यांनी निर्माण केलेली सामाजिक जाणीव आणि वैचारिक बांधिलकी ही त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे," असे प्रतिपादन केले. तसेच प्रख्यात तत्त्वज्ञ डॉ. यशवंत मनोहर यांनी श्रीधर अंभोरे यांच्या निधनाबद्दल व्यक्त केलेल्या शोकसंदेशाचेही त्यांनी वाचन केले.

या प्रसंगी मा. वासुदेव फुसाटे यांनी श्रीधर अंभोरे यांच्या निधनाने कलाक्षेत्रासोबतच परिवर्तनवादी चळवळीचीही मोठी हानी झाली असल्याची भावना व्यक्त केली. आदरांजली सभेचे प्रास्ताविक प्रा. ज्योतिक ढाले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. धर्मरक्षित टेंभुर्णे यांनी केले, तर डॉ. सुशील मेश्राम यांनी आभार मानले.

## महावितरणच्या 'ग्राहक समाधान शिबिरा'त नागपुरात ९१ टक्के तक्रारींचा जागेवरच निपटारा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरात वीज ग्राहकांच्या समस्यांचे तात्काळ, पारदर्शक आणि प्रभावी निवारण करण्यासाठी महावितरणतर्फे आयोजित 'ग्राहक समाधान शिबिराला' नागपूरकरांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. बुधवारी पार पडलेल्या या विशेष शिबिरामध्ये वीज ग्राहकांच्या विविध अडचणींचे जागेवरच समाधान करण्यात आले असून, प्राप्त झालेल्या एकूण ३३६ तक्रारींपैकी तब्बल ३०६ तक्रारींचे (म्हणजेच ९१.०७ टक्के तक्रारींचे) ऑन दि स्पॉट यशस्वी निवारण करून ग्राहकांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. उर्वरित ३० तक्रारी देखील पुढील सात दिवसांच्या आत प्राधान्याने सोडवण्यात येतील, असा विश्वास महावितरणतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.




मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे यांच्या नेतृत्वाखाली नागपूर शहर मंडलांतर्गत येणाऱ्या कॉंग्रेसनगर, महाल, गांधीबाग, सिव्हील लाईन्स आणि बुटीबोरी या सर्व पाचही विभागांतील एकूण १९ उपविभागांमध्ये एकाच दिवशी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वीज ग्राहकांच्या समस्या त्यांच्याच कार्यक्षेत्रात जलदगतीने सुटाव्यात, हा यामागचा मुख्य उद्देश होता.

शिबिरामध्ये प्रामुख्याने नवीन वीज जोडणी, वीज बिलांमधील नावात व पत्त्यात बदल, सरासरी व वाढीव वीजबिले, रुफ टॉप सौर योजना तसेच आधुनिक स्मार्ट मीटरशी संबंधित तक्रारी दाखल झाल्या होत्या. या सर्व समस्यांचे तात्काळ उच्चाटन करण्यासाठी महावितरणचे वरिष्ठ अधिकारी, कार्यकारी अभियंते, अतिरिक्त कार्यकारी अभियंते आणि सर्व संबंधित तांत्रिक कर्मचारी प्रत्येक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित होते.

विशेष म्हणजे, आलेल्या तक्रारींवर तातडीने अंमलबजावणी करण्यात आली. यात नाव व पत्त्या बदलासंबंधीच्या सर्व ३० तक्रारी, खंडित वीज पुरवठ्याच्या १८ पैकी १८ तक्रारी आणि नवीन वीज जोडणीच्या २ तक्रारींचा जागेवरच निपटारा करण्यात आला. तसेच, वाढीव बिलांच्या १५८ पैकी १५२ तक्रारी, स्मार्ट मीटरच्या ५३ पैकी ४७ तक्रारी आणि रुफ टॉप सौर योजनेच्या ४४ पैकी ३९ तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात आले.

यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी ग्राहकांशी संवाद साधत स्मार्ट मीटरबाबतच्या शंकांचे सविस्तर निरसन केले. अचूक मीटर रीडिंग, दिवसा वीज वापरावर मिळणारी प्रति युनिट ८५ पैसे सवलत, ग्राहकाच्या मोबाईल अँपवर उपलब्ध होणारी रिअल टाईम वीज वापराची नोंद आणि करंट लिकेजची अचूक माहिती यांसारख्या आधुनिक सुविधांमुळे स्मार्ट मीटर अत्यंत पारदर्शक व फायदेशीर असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून ग्राहकांच्या प्रत्येक अडचणीला प्राधान्य देऊन ती सोडवली जाईल, अशी ग्वाही महावितरणने उपस्थित ग्राहकांना दिली. हे ग्राहक समाधान शिबिर आता दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या बुधवारी सकाळी १० ते दुपारी १ यावेळेत सर्व उपविभागिय कार्यालयांत आयोजीत करण्यात येनार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## रामटेक श्रीराम मंदीर समिती स्थापना विधेयक २०२६ मध्ये सुधारणा कराव्या, स्थानिक रामभक्ताच्या सुचनांचा समावेश व्हावा, माजी आमदार डी.मल्लीकार्जुन रेड्डी

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक येथील प्रसिद्ध राम मंदीरासाठी ट्रस्टची स्थापना व्हावी, यातुन मंदीराचा विकास व्हावा यासाठी १० जुलै २०२६ ला महाराष्ट्र विधानसभा व विधान परिषदेत रामटेक श्रीराम मंदीर समिती स्थापना विधेयक २०२६ मंजुर झाले. रामटेक परिसरातील रामभक्तांना व धार्मिक नागरिकांना याबाबत आपले मत मांडण्यासाठी वेळ दिला गेला नाही. व शेवटच्या दिवशी हे विधेयक घाई घाईत मंजुर करण्यात आले.



त्यामुळे मंदीरात नेहमी सेवा देणारे भारतीय जनसेवा मंडळ, काकड आरती भक्त परीवार यांच्या वतीने माजी आमदार डी मल्लीकार्जुन रेड्डी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देवुन या विधेयकात रामटेक रामभक्ताच्या भावणांचा विचार करुन सुधारणा कराव्या अशी मागणी केली आहे. यात प्रामुख्याने रामटेक श्रीराम मंदीर शासकीय समिती २०२६ मध्ये राजकीय जनप्रतिनिधी समितीत नसावा. सदस्यांना कोणतेही मानधन देण्यात येवु नये.

स्थानिक रामभक्तांना जे कोणत्याही पक्षासी संबंधीत नाही या समितीमध्ये स्थान देण्यात यावे.पवित्र श्रीराम मंदीर ट्रस्ट हे निःपक्ष असावे अशी मागणी करण्यात आली. रामटेक गडमंदीराच्या मालकी हक्काचा वाद न्याय प्रविष्ट आहे. त्यामुळे या मंदिराच्या देखभालीसाठी उपविभागीय अधिकारी यांची केअरटेकर म्हणून नियुक्ती केली आहे. पण येथे ट्रस्ट असावी यासाठी काही रामभक्त न्यायालयात गेले होते.

रामटेक येथील मंदीराचा विकास व्हावा व रामभक्तांना विविध सुविधा उपलब्ध व्हाव्यात ही प्रमुख भुमिका होती. शेवटी विधेयक मंजूर झाले व ट्रस्ट निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला. पण यात कोणतेही राजकारण येणार नाही याची दक्षता घ्यावी अशी रामटेकराची अपेक्षा आहे.

